

# रामदासांचा जीवन-वेद

पु. पां. गोखले

# रामदासांचा जीवन-वेद

संयोजक
पु. पां. गोखले

मूल्य एक रुपया पंचवीस पैसे

इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे

प्रकाशक :

श्याम दयार्णव कोपर्डेकर

इंद्रायणी साहित्य

१२५७ सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रथम मुद्रण : १९७१

मुद्रक :

शशिकान्त महादेव देव

सुलभ मुद्रणालय

२९१ शनिवार पेठ, पुणे ३०

इंद्रायणी साहित्य

पुणे

# आरंभीचे थोडेसे

ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकाराम–गाथा आणि समर्थांचा दासबोध, हे मराठीचे चार वेद आहेत असे ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर म्हणत. " संसार साधुनि परमार्थाचा लाभ जयाने केला। तो नर भला, भला, भला ॥ " अशीच सर्व संतांची शिकवण आहे. ती साकार करावयास

कर्मे ठामपणे करोनि निपुणे नारायणी अर्पिणे।
पापाते क्षपणे रमापतिगुणे प्रेमामृता सेवणे ॥
सत्संगी वसणे, स्मृतीत असणे, एकांति सच्चिंतने।
दीना उद्धरणे, जना मिळविणे, अन्याय संहारणे ॥

हाच ठाम मार्ग आहे. तो समर्थांनी प्रसंगाप्रसंगाने व्यवहारशुद्ध कसा राखावा हे ठसठशीत वचनांनी सांगितले आहे. म्हणून त्यांची विषयवारी एकसूत्री करून एकंदर त्यांनी प्रबोधिलेला जीवन–वेद येथे सादर केला आहे. त्यावरून समर्थांची शिकवण सहजपणे समजावी अशी अपेक्षा आहे.

—पु. पां. गोखले

# समर्थ रामदास

स्वर्वेष्टि–सुरभि–सुरः सरिदाधिकश्रित–सर्व-कामादासाची ।
श्रीरामाची जैशी सत्कीर्ती तशिच रामदासाची ।। – मोरोपंत

विविधलक्षणयुक्त अधिकारी शिष्यमहंतांच्या साहाय्याने युगपुरुषाने, आपल्या राष्ट्राला गौरवाचे स्थान प्राप्त व्हावे म्हणून उदंड राजकारण आणि अमाप लोकसंग्रह केला, व आपल्या तेजस्वी वाणीने भारतातील अगणित लोकांच्या जीवनात क्रांती घडविली. कोणी तरी समर्थांना "क्रांतिकारक रामदास" असे म्हटलेही आहे.

प्राचीन परंपरेत गुरुकुलांतून बाहेर पडताना शिष्यांना 'सत्यं वद, धर्मं चर' इ. आदेश दिला जात असे; प्रत्यक्ष लोककार्यांत आपल्या शिष्यांना रवाना करिताना श्रीसमर्थही असा कळकळीचा बोध देत-ते म्हणत– 'आता तुम्ही राष्ट्राच्या भिन्न भिन्न (नेमून दिलेल्या) भागांत परिभ्रमण करा. तेथील लोकांची भिक्षेच्या मिषाने चाळणा करून वेचक लोक राष्ट्राकरिता तन–मन–धन अर्पण करण्यास तयार होतील असा अचूक यत्न करा. खेड्यापाड्यांतील झोपडी-झोपडीमधून जा, आणि सर्वांना सौम्य वाणीने समजावून सांगा की, बांधवहो, तुम्ही झोपी गेला आहांत काय? निद्रेचा त्याग करावा अशी वेळ अजून आली नाही का? तुम्हांला राष्ट्राचे, धर्माचे व मायबहिणींच्या पवित्र शीलाचे काही शुभाशुभ वाटत नाही काय? आपलीच सुखसोय, आपलाच ऐषाराम यात गुंग राहून तुम्ही कोणत्या घोर पापाचे धनी होणार आहांत? स्वतःपलीकडे समाजासंबंधी आणि राष्ट्रासंबंधी आपले काही कर्तव्य आहे याची जागृती घ्या ना! अस्मानी सुलतानीच्या भयाने निराश होऊन स्वाभिमानशून्य जीवन जगू नका. तुमचे थोर थोर पूर्वज, तुमची भयकारी झोप कधी संपणार म्हणून विचारीत आहेत, ते ऐका. धीर धरा, गडबडू नका, तकवा सोडू नका, केल्याने होत आहे, यत्न तो देव जाणून वन्ही तो चेतवावा. श्री रामानी वानरांच्या सहाय्याने मदोन्मत्त रावणाला मातीमोल केले व श्रीकृष्णाने गवळी–शेतकरी यांच्या मदतीने मोठमोठे राजे महाराजे ठार मारून त्यांची जुलमी राज्ये

धुळीला मिळविली, आणि जनतेला सुखी केले आहे. मथुरेचा कंस, चेदी देशाचा शिशुपाल, मगध देशाचा जरासंध तसेच शृगाल, पौंड्रक, नरकासुर, दुर्योधनादी सम्राटांना नाहीसे करून त्याने संदेश दिला आहे की—

स्वधर्मे निधनं श्रेयः— धर्मासाठीं मरावें ।
परी ना दुजाचे द्रव्य वा राज्य घ्यावें ॥

'प्रिय शिष्यांनो, तुम्ही स्वतः राष्ट्रकल्याणाच्या मार्गावर उभे राहून; लोकांनाही राष्ट्रधर्मनिष्ठेच्या सामर्थ्याचा साक्षात्कार होईल असे कार्य करा.' समर्थांच्या या बोधाप्रमाणे, आपल्या कर्तृत्वाने रथी अतिरथी ठरून जे शिष्य नवराष्ट्राच्या उभारणीसाठी आणि उत्कर्षासाठी बद्धपरिकर झाले व या महान् प्राणयज्ञदलाचे पाईक बनले आणि मुखात रामनाम, खांद्यावर झोळी आणि जीवनात लोकसेवेचे व्रत घेऊन गुरु—आज्ञेप्रमाणे महाराष्ट्रधर्माकरिता अहर्निश चंदनाप्रमाणे झिजले. त्यात कल्याणस्वामी सर्वश्रेष्ठ मानले पाहिजेत. रामायणात जे मारुतीचे स्थान तेच दासायनात कल्याणाचे. 'नारायण विधि वसिष्ठ राम । रामदास कल्याण धाम' असे जे परंपरेचे भजन आहे ते कल्याणांच्या या अधिकाराचे पावनदर्शन घडवीत आहे.

समर्थ रामदास यांच्यासारखा 'बडा राष्ट्रीय संघटक झाला नाही,' याबद्दल डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. राधाकृष्णन्, महात्मा गांधी यांच्यासारख्या आधुनिक राष्ट्रोद्धारकांचे एकमत आहे. सिंहलद्वीपापासून हिमालयापर्यंत रामदासांचे मठ आणि मारुती पसरले असून पोर्तुगीजांच्या राजकीय सूत्रधारांनी 'शिवाजीचा समर्थ व चाणाक्ष सहकारी रामदासच' असल्याचे नमूद करून ठेवले आहे. चेतनाहीन भारताला चैतन्यमय करून सोडणारा सन्त आणि अखंड भारताच्या एकजिनसीपणाने त्याच्या निर्मळ स्वातंत्र्याचा वैचारिक पाया घालणारा समाजशिक्षक म्हणून रामदासांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमी राजकारणाला साथ दिली म्हणूनच, वैदिकधर्म हैराण अवस्थेतूनही हिऱ्यासारखा चमकत राहिला. 'उच्च भव्य तितुके' आचरून शाश्वतपणे भारताने जगात महान् राष्ट्र म्हणून नांदावे, हीच समर्थ-शिकवणीची परिणती होती व आहे. गमावलेले स्वातंत्र्य कमावणे कष्टासायासांचेच असते; ते मिळवल्यावर ते राखणे खूप शर्तीचे कर्तव्य असते; पण ते सातत्याने सत्वशील सांभाळणे हे जीवाभावाने करावे लागते व ते जिवाच्या करारावरच

होते. या तपश्चर्येची प्रेरणा शिवसमर्थ—कार्यांच्या सक्रीय अभ्यसनातच आहे. ईश्वरी साक्षात्कार आणि युक्ति—बुद्धि—शहाणपणाचा व्यवहार, यांचा मनोरम प्रीतिसंगम म्हणजेच शिवसमर्थ — चरित्रचारित्र्याचा निष्कर्ष. संस्कृतिसंरक्षक राजदंड हाच शान्तिब्रह्माचा उपासक, हेच प्रबोधन सर्वांना शान्ती, पुष्टी, तुष्टी देऊन कोणी करीत असेल, तर शिवसमर्थ — कर्तृत्वाचे रामायण. लोकमान्य टिळकांपासून पं. जवाहरलाल नेहरूंपर्यंत ज्या ज्या इतिहासवेत्त्यांनी भारतसेवक म्हणून तपश्चर्या केली व देह झिजविले त्या त्या सर्वांचे एकमत आहे. शिवसमर्थ संघटने — संबंधाने, 'सावधान ! सावधान ! अखंड सावधान !' हा जीवनाचा बीजमंत्र रामदासांच्या शिवाय व्यावहारिक, पारमार्थिक, राजकीय आणि राष्ट्रीय कार्यक्षेत्रात, कोण्या संताने दिला ? ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे—

वेद जेणे सुभाष । सुख जेणे सोल्लास ।
हे असो रूपस । विश्व जेणे ।। ( १८।१७२७ )

असे वर्तन माणसामाणसाकडून होत गेले तरच भारत संस्कृतिसंपन्न स्वातंत्र्य प्रभावीपणे भोगीत व चालवीत राहणार आहे; हे नीट—धीरपणे समर्थांनीच भारतीयांना शिकविले. आणि तेही 'अलौकिक होऊ नये लोकाप्रति' असे.

दिसे सकळासी सारखा । पाहात विवेकी नेटका ।।
कामी, निकामी लोका । बरे पाहे ।।
जाणोन पाहिजेत सर्व । हेहि तयाचे अपूर्व ।।
ज्याचे त्यापरी गौरव । राखो जाणे ।।

या नेतृत्वनम्रतेच्या पथ्यांनी लोकसंग्रह करून समर्थ चालले होते.

ढगाशिवाय पाऊस नाही, पावसाशिवाय पीक नाही, बीजाशिवाय फल नाही, तशीच गुरूशिवाय सुखाची किल्ली सापडत नाही. चिमणी आहे. तेल आहे, कातरलेली वात आहे, पण पेटविणारी काडी नाही, तर दिवा कसा जळणार ? गुरुवीण गती नाही, म्हणण्याचा अर्थ आहे. वैयक्तिक, सामूहिक, सामाजिक, राष्ट्रीय जीवनात गुरू प्रकाशज्योत देतो. त्यायोगे शिष्याचा, अनुयायाचा, जनसामान्याचा मार्ग सुकर होतो. ध्येयाच्या उत्तुंग शिखरावर

त्या प्रकाशझोतामुळेच सरळ आरूढ होता येते; अंतरीची वजनदारी, शान्ती ब्रह्मानंदलहरी आणि बारकाव्यांची दृष्टी यांचा प्रत्यय येत जातो. समर्थ रामदासांनी जनसामान्याला रामराज्यासाठी रघुकुलरीती म्हणजेच मानवी जीवनाची नीती प्रथम शिकवली. जीव जाईल पण जीभ अमर राहील. ‘ बोले तैसा चाले ’ असे होण्यासाठी ‘ आधी केले मग सांगितले ’ ही रीती अधिक प्रभावी व समाजात आत्मविश्वासाची परिणति करणारी. राम–रहिम–कृष्ण-ख्रिस्त सवे ॐ कारमयच खरे; पण ते आपल्या अंतःकरणातून उमटले पाहिजेत. धर्मातील साक्षात्कार तोच आहे.

तो व्हावयाचा असेल, सर्वाभूती परमेश्वर पहावयाचा असेल, ‘ जे जे भेटे भूत । ते ते मानि जे भगवन्त । ’ हा स्वभाव व्हायचा असेल तर जनजागृतिसाठी असलेले मनाचे श्लोक त्यांच्या प्रबोधनासह माणसाचे मेंदूत मुरवून घेतले पाहिजेत. ‘ भव्य उदात्त तितुके घ्यावे । मिळमिळित अवघेचि टाकावे । ’ ही वृत्ती त्या उपासनेनेच निर्माण होईल. ती वृत्ती एकदा निर्माण झाली की पाश्चात्त्य व पौर्वात्य संस्कृतीतील सोनफुलांचा सुगंधमय संचय करूनच कर्तव्यपूर्तीची फुले माणसाला परमेश्वरचरणी वाहता येतील.

स्वलक्षणधारणाद्धर्मः या यशोवर्म्यांच्या व्याख्येप्रमाणे समर्थ रामदासांचा ‘ महाराष्ट्रधर्म ’ आहे. ‘ मेला तरच हटतो ’ असा ‘ मऱ्हाटा तेवढा मेळवावा ’ ही धर्माची परंपरा आहे. ‘ भाग्यासी काय उणे रे ? यत्ना वाचोनि राहिले । ’ अशी त्याची शिकवण असून ‘ केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे । यत्न तो देव जाणावा । अंतरी तुष्टता बरे ।। ’ असे त्याचे आश्वासन आहे. ‘ अचूक चुकेना कोठे, त्याची राज्ये समस्तही । ’ असा त्याचा आत्मविश्वास असून, ‘ जो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला । ’ असे त्याचे लोकसंग्रह सूत्र आहे. ‘ राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे । ’ हा ‘ सर्वेषामविरोध ’ साधण्याचा मूलमंत्र आहे. महाराष्ट्रधर्म ‘ दैत्य संहारिले मागे । ऐसे ऊदंड ऐकितो । परंतु रोकडे काही । शीघ्र आम्हासि दाखवी ।। ’ असा शक्तिदेवतेला सवाल करतो, तो ‘ देवा बोले, भक्ता लागे । ’ हा व्यवहार साधण्यासाठी. अशा या महाराष्ट्रधर्मसंवर्धक सद्गुरू समर्थ रामदासांना कोटी कोटी प्रणाम.

✩ ✩

# प्रास्ताविक

ऐका संसारासि आले हो ।
स्त्रीपुरुष निःस्पृह हो ।
सुचिपणे पाहो । अर्थांतर ।। १ ।। ( द. १२ स. २ )

लोकी संसार करावा ।
नाना यत्ने आटोपावा ।
लोकांमध्ये मिरवावा ।
पुरुषार्थ आपला ।। २ ।।

# रामदासांचा व्यवहारबोध

## १. मंगलाचरण

ॐ नमोजी गणनायका । सर्वसिद्धि फळदायका ।
अज्ञानभ्रांति – छेदका । बोधरूपा ॥ १ ॥
वंदूनिया मंगलनिधी । कार्य करिता सर्वसिद्धी ॥
आघात अडथळे उपाधी । बाधू शकेना ॥ २ ॥ ( द. १ स. २ )
आता वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता ॥
शब्दमूळ वाग्देवता । महामाया ॥ ३ ॥
जे जे दृष्टीने देखिले । जे जे शब्दे वोळखिले ॥
जे जे मनास भासले । तितुके रूप जियेचे ॥ ४ ॥
म्हणून थोराहून थोर । जो ईश्वराचा ईश्वर ॥
तियेशी माझा नमस्कार । तदंशेचि आता ॥ ५ ॥ ( द. १ स. ३ )
भक्त प्रेमळ भाविक । सभ्य, सखोल, सात्त्विक ॥
रम्य, रसाळ, गायक । निष्ठावंत ॥ ६ ॥
कर्मशील, आचारशील । दानशील, धर्मशील
शुचिष्मंत पुण्यशील । अंतरशुद्ध कृपाळू ॥ ७ ॥
संत, सज्जन विद्वज्जन । वेदज्ञ, शास्त्रज्ञ महाजन
प्रबुद्ध सर्वज्ञ, समाधान । विमळकर्ते ॥ ८ ॥
शांतिक्षमा दयाशीळ । पवित्र आणि तत्त्वशीळ
अंतरशुद्ध ज्ञानशील । ईश्वरी पुरुष ॥ ९ ॥
ऐसे परमेश्वराचे जन । त्यासि माझे अभिवंदन
जयाचेनि समाधान । अकस्मात बाणे ॥ १० ॥ ( द. १ स. ८ )

## २. दुश्चित लक्षणे

अर्थप्रमेय ग्रंथांतरी । शोधून घ्यावे अभ्यंतरी
दुश्चितपण आले तरी । पुन्हा श्रवण करावे ॥ १ ॥
अर्थांतर पाहिल्यावीण । उगाच करी जो श्रवण ।
श्रोता नव्हे पाषाण । मनुष्यवेषे ॥ २ ॥
टाकिने खपली फोडिली । ते मागुती नाही जडली ।
मनुष्याची कुबुद्धि झाडिली । तरी ते पुन्हा लागे ॥ ३ ॥
आता असो हे बोलणे । घात होतो दुश्चितपणे ।
दुश्चितपणाचेनि गुणे । प्रपंच ना परमार्थ ॥ ४ ॥
दुश्चितपणे बैसलाच दिसे । परी तो असतचि नसे ।
चंचळ चक्री पडिले असे । मानस तयाचे ॥ ५ ॥
सावध असोनि उमजेना । श्रवण असोनि ऐकेना ।
ज्ञान असोनि कळेना । सारासार विचार ॥ ६ ॥
ऐसा जो दुश्चित आळशी । सौख्य कैचे तयासी ।
जयाचे जीवी अहर्निशी । आळस वसे ॥ ७ ॥ ( द. ८ स. ६ )

## ३. मूर्खलक्षणे

निद्रा आळस दुश्चितपण । हेचि मूर्खाचे लक्षण ।
जेणेकरता निरुपण । उमजेचिना ॥ १ ॥ ( द. ८ स. ६ )
वंदुनी सद्गुरुचरण । करूनी रघुनाथ स्मरण ।
त्यागार्थ मूर्खलक्षण । बोलिजेल ॥ २ ॥
जन्मला जयाचे उदरी । तयासी जो विरोध करी ।
सखी मानिली अंतुरी । तो एक मूर्ख ॥ ३ ॥

समर्थावरी अहंता । अंतरी मानी समता ।
सामर्थ्येवीण करी सत्ता । तो एक मूर्ख ॥ ४ ॥
आपली आपण करी स्तुती । स्वदेशी भोगी विपत्ति ।
सांगे वडिलांची कीर्ती । तो एक मूर्ख ॥ ५ ॥
अकारण हास्य करी । विवेक सांगता न धरी ।
जो बहुतांचा वैरी । तो एक मूर्ख ॥ ६ ॥
आपली धरुनिया दुरी । पराव्यासी मैत्री करी ।
परन्यून बोले रात्री । तो एक मूर्ख ॥ ७ ॥
बहुत जागते जन । तयांमध्ये करी शयन ।
परस्थळी बहुभोजन । करी तो एक मूर्ख ॥ ८ ॥
धरूनी परावी आस । प्रयत्न सांडी सावकाश ।
निसुगाईचा मानी संतोष । तो एक मूर्ख ॥ ९ ॥
घरी विवेक उमजे । आणि सभेमध्ये लाजे ।
शब्द बोलता निर्बुजे । तो एक मूर्ख ॥ १० ॥
नायके त्यास शिकवी । वडिलासी जाणीव दावी ।
जो आरजास गोवी । तो एक मूर्ख ॥ ११ ॥
औषध ना घे असूनि व्यथा । पथ्य न करी सर्वथा ।
न मिळे आलिया पदार्था । तो एक मूर्ख ॥ १२ ॥
आपणासि जेथे मान । तेथे अखंड करी गमन ।
राखू नेणे मानाभिमान । तो एक मूर्ख ॥ १३ ॥
विचार न करता कारण । दंड करी अपराधेवीण ।
स्वल्पासाठी जो कृपण । तो एक मूर्ख ॥ १४ ॥
घरीच्या घरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा ।
ऐसा जो का वेडमूढा । तो एक मूर्ख ॥ १५ ॥

स्वये नेणे परोपकार । उपकाराचा अनुपकार ।
करी थोडे बोले फार । तो एक मूर्ख ॥ १६ ॥
विद्या, वैभव ना धन । पुरुषार्थ, सामर्थ्य, ना मान ।
कोरडाच वाहे अभिमान । तो एक मूर्ख ॥ १७ ॥
जिवलगासी परम खेदी । सुखाचा शब्द तोही नेदी ।
नीच जनासि वंदी । तो एक मूर्ख ॥ १८ ॥
जैसे जैसे करावे । तैसे तैसे पावावे ।
हे जयासि नेणवे । तो एक मूर्ख ॥ १९ ॥
दुर्जनाचेनि बोले । मर्यादा सांडोन चाले ।
दिवसा झाकले डोळे । तो एक मूर्ख ॥ २० ॥
देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही ।
ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो एक मूर्ख ॥ २१ ॥
परपीडेचे मानी सुख । परसंतोषाचे मानी दुःख ।
गेले वस्तूचा करी शोक । तो एक मूर्ख ॥ २२ ॥
आदरेवीण बोलणे । न पुसता साक्ष देणे ।
निंद्य वस्तु अंगिकारणे । तो एक मूर्ख ॥ २३ ॥
तुक तोडोनि बोले । मार्ग सोडोनि चाले ।
कुकर्मी मित्र केले । तो एक मूर्ख ॥ २४ ॥
पत राखो नेणे कदा । विनोद करी सर्वदा ।
हासता खिजे पेटे द्वंद्वा । तो एक मूर्ख ॥ २५ ॥
होड घाली अवघड । काजेवीण करी बडबड ।
बोलोच नेणे मुखजड । तो एक मूर्ख ॥ २६ ॥
संसारदुःखाचेनि गुणे । देवासी गाळी देणे ।
मैत्र्याचे बोले उणे । तो एक मूर्ख ॥ २७ ॥

अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ धारकी धरी ।
जो विश्वासघात करी । तो एक मूर्ख ॥ २८ ॥
समर्थांचे मनीचा तुटे । जयाचेनि सभा विटे ।
क्षणी बरा क्षणी पालटे । तो एक मूर्ख ॥ २९ ॥
अनीतीने द्रव्य जोडी । धर्म, नीति, न्याय सोडी ।
संगतीचे मनुष्य तोडी । तो एक मूर्ख ॥ ३० ॥
कलह पहात उभा राहे । ते सोडवीना कौतुक पाहे ।
खरे असता खोटे साहे । तो एक मूर्ख ॥ ३१ ॥
आपले काज होय तोवरी । बहुसाल नम्रता धरी ।
पुढिलांचे कार्य न करी । तो एक मूर्ख ॥ ३२ ॥
अक्षरे गाळूनि वाची । काही घाली पदरीची ।
निगा न करी पुस्तकाची । तो एक मूर्ख ॥ ३३ ॥
आपण वाचीना कधी । कोणास वाचावया नेदी ।
पुस्तक बांधोनि ठेवी बंदी । तो एक मूर्ख ॥ ३४ ॥
सांडोनिया जगदीशा । मनुष्याचा मानी भरवसा ।
सार्थकेवीण वेची वयसा । तो एक मूर्ख ॥ ३५ ॥
मूर्ख लक्षणे अपार असती । परी काही एक यथामति ।
त्यागार्थ बोलिलो श्रोती । क्षमा केली पाहिजे ॥ ३६ ॥ (द. २ स. १)
आपले हित न करी लौकिकी । तो जाणावा आत्मघातकी ।
त्या मूर्खाएवढा पातकी । आणिक नाही ॥ ३७ ॥ (द. १५ स. ३)

## ४. पढतमूर्ख-लक्षणे

ब्रह्मश्रुत आणि व्युत्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान ।
दुराश आणि अभिमान । धरी तो एक पढतमूर्ख ॥ १ ॥

मुक्तक्रिया प्रतिपादी । सगुण भक्ती उच्छेदी ।
स्वधर्म आणि साधन निंदी । तो एक पढतमूर्ख ॥ २ ॥
आपुलेनि ज्ञातेपणे । सकळासीं शब्द ठेवणे ।
प्राणिमात्रांचे पाही उणे । तो एक पढतमूर्ख ॥ ३ ॥
समूळ ग्रंथ पाहिल्यावीण । उगाच ठेवी जो दूषण ।
गुण सांगता पाहे अवगुण । तो एक पढतमूर्ख ॥ ४ ॥
जाणपणे मनी भरे । आला क्रोध नावरे ।
क्रिया शब्दास अंतरे । तो एक पढतमूर्ख ॥ ५ ॥
श्रोता बहुश्रुतपणे । वक्त्यासी आणी उणें ।
वाचाळपणाचेनि गुणे । तो एक पढतमूर्ख ॥ ६ ॥
दोष ठेवी पुढिलासी । तेच स्वये आपणापासीं ।
ऐसे कळेना जयासी । तो एक पढतमूर्ख ॥ ७ ॥
अभ्यासाचेनि गुणे । सकळ विद्या जाणे ।
जनासी निववू नेणे । तो एक पढतमूर्ख ॥ ८ ॥
भरोनि वैभवाचे भरी । जीवमात्रासी तुच्छ करी ।
पाखांड मत थावरी । तो एक पढतमूर्ख ॥ ९ ॥
श्रवण होता अभ्यंतरी । गुणदोषांची चाळणा करी ।
परभूषणे मत्सरी । तो एक पढतमूर्ख ॥ १० ॥
आदर देखोनि मन धरी । कीर्तिवीण स्तुति करी ।
सवेंचि निंदी अनादरी । तो एक पढतमूर्ख ॥ ११ ॥
मागे एक पुढे एक । ऐसा जयाचा दण्डक ।
बोले एक करी एक । तो एक पढतमूर्ख ॥ १२ ॥
यथार्थ सांडूनि वचन । जो रक्षून बोले मन ।
ज्याचे जिणे पराधीन । तो एक पढतमूर्ख ॥ १३ ॥

सोंग संपादी वरिवरी । करू नये तेचि करी ।
मार्ग चुकोनी भरे भरी । तों एक पढतमूर्ख ।। १४ ।।
रात्रंदिवस करी श्रवण । न सांडी आपुले अवगुण ।
स्वहित आपले नेणे आपण । तो एक पढतमूर्ख ।। १५ ।।
निरूपणी भले भले । श्रोते येवोनि बैसले ।
क्षुद्रे लक्षूनि बोले । तो एक पढतमूर्ख ।। १६ ।।
त्यागावया अवगुण । बोलिलो पढतमूर्खांचे लक्षण ।
विचक्षणा न्यून पूर्ण । क्षमा केली पाहिजे ।। १७ ।।

## ५. उत्तम लक्षणे

श्रोती व्हावे सावधान । आता सांगतो उत्तम गुण ।
जेणे करता बाणे खूण । सर्वज्ञपणाची ।। १ ।।
वाट पुसल्यावीण जाऊ नये । फळ ओळखल्यावीण खाऊ नये ।
पडिली वस्तु घेऊ नये । एकाएकी ।। २ ।।
अतिवाद करू नये । पोटी कपट धरू नये ।
छद्म काढून बोलू नये । काही केल्या ।। ३ ।।
विवंचनेवीण चालू नये । मर्यादेवीण हालू नये ।
विचारेवीण बोलू नये । काही एक ।। ४ ।।
प्रीतीविण रुसू नये । चोरासी ओळखी पुसू नये ।
रात्री पंथ क्रमू नये । एकाएकी ।। ५ ।।
जनी आर्जव तोडू नये । पापद्रव्य जोडू नये ।
पुण्यमार्ग सोडू नये । कदाकाळी ।। ६ ।।
निंदा द्वेष करू नये । असत्संग धरू नये ।
द्रव्यादिक हरू नये । बलात्कारे ।। ७ ।।

वक्त्यास खोदू नये । ऐक्यतेस फोडू नये ।
विद्या अभ्यास सोडू नये । काही केल्या ॥ ८ ॥
तोंडाळाशी भांडू नये । वाचाळाशी तंडू नये ।
संतसंग खंडू नये । अंतर्यामी ॥ ९ ॥
अतिक्रोध करू नये । जिवलगासी खेदू नये ।
मनी वीट मानू नये । शिकवणीचा ॥ १० ॥
क्षणक्षणा रुसू नये । लटिका पुरुषार्थ बोलू नये ।
केल्यावीण सांगू नये । आपुला पराक्रम ॥ ११ ॥
बोलिला बोल विसरू नये । प्रसंगी सामर्थ्य चुकू नये ।
केल्यावीण निखंदू नये । पुढिलासी कदा ॥ १२ ॥
सुखा अंग देऊ नये । प्रयत्न पुरुषे सांडू नये ।
कष्ट करता त्रासू नये । निरंतर ॥ १३ ॥
कोणाचा उपकार घेऊ नये । घेतला तरी राखो नये ।
परपीडा करू नये । विश्वासघात ॥ १४ ॥
शौचेवीण असू नये । मळिण वस्त्र नेसू नये ।
जाणारासी पुसो नये । कोठे जातोसी म्हणोनी ॥ १५ ॥
व्यापकपण सोडू नये । पराधीन होऊ नये ।
आपले ओझे घालू नये । कोणाएकासी ॥ १६ ॥
पत्रेवीण पर्वत करू नये । हीनाचे ऋण घेऊ नये ।
ग्वाहीवीण जाऊ नये । राजद्वारी ॥ १७ ॥
लटकी जाजू घेऊ नये । सभेसि लटके करू नये ।
आदर नसता बोलू नये । स्वाभाविक ॥ १८ ॥
अदेखणेपण करू नये । अन्यायावीण गांजू नये ।
अनीतीने वर्तू नये । अंगबळे ॥ १९ ॥

बहुत अन्न खाऊ नये । बहुत निद्रा करू नये ।
बहुत दिवस राहू नये ! पिशुनाचे येथे ॥ २० ॥
कामेवीण राहू नये । नीच उत्तर साहू नये ।
आसुदे अन्न सेवू नये । वडिलांचेही ॥ २१ ॥
तोंडी शिवी असू नये । दुसऱ्यास देखोन हासू नये ।
उणे अंगी संचरू नये । कुळवंताचे ॥ २२ ॥
समयी यावा चुकू नये । सत्वगुण सांडू नये ।
वैरियाशीं दंडू नये । शरण आलिया ॥ २३ ॥
मूर्खांशी संबंध पाडू नये । अंधारी सुत घालू नये ।
दुश्चितपणे विसरू नये । वस्तु आपुली ॥ २४ ॥
सभा देखोन गळू नये । समयी उत्तर टळू नये ।
धिक्कारिता चळू नये । धारिष्ट आपुले ॥ २५ ॥
अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाढवावी ।
विवेके दृढ धरावी । वाट सत्याची ॥ २६ ॥ ( द. २ स. २ )

## ६. करंटक-लक्षणे

आळस उदास नागवणा । आळस प्रयत्न-बुडवणा ।
आळसे करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥ १ ॥ ( द. ११ स. ३ )
शुचित करुनि अंतःकरण । ऐका करंटक-लक्षण ।
हे त्यागिता सदैव लक्षण । अंगी बाणे ॥ २ ॥
करंट्यास आळस आवडे । यत्न कदापि नावडे ।
त्याची वासना वावडे । अधर्मी सदा ॥ ३ ॥
लिहू नेणे, वाचू नेणे । सवदासूत घेऊ नेणे ।
हिशेब कितेब राखो नेणे । धोरण नाही ॥ ४ ॥

हारवी, सांडी, पाडी, फोडी। विसरे चुके नाना खोडी।
भल्याचे संगतीची गोडी। कदापि नाही ॥ ५ ॥
दीर्घसूचना सुचेचिना। न्याय नीति हे रुचेना।
पराभिलाषी वासना। निरंतर ॥ ६ ॥
आळसे शरीर पाळी। अखंड कुशी कांडोळी।
निद्रेचे पाडी सुकाळी। आपणासी ॥ ७ ॥
जनासी मैत्री करीना। कठिण शब्द बोले नाना।
मूर्खपणे आवरेना। कोणीएकासी ॥ ८ ॥
पवित्र लोकांमध्ये भिडावे। ओंगळामध्ये नि:शंक धावे।
सदा मनापासून भावे। जननिंद्य क्रिया ॥ ९ ॥
तेथे कैचा परोपकार। केला बहुतांचा संहार।
पापी अनर्थी अपस्मार। सर्व अबुद्धि ॥ १० ॥
शब्द सांभाळून बोलेना। आवरिता आवरेना।
कोणीएकासी मानेना। बोलणे त्याचे ॥ ११ ॥
राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे।
ऐसी हे विवेकाची उत्तरे। ऐकणार नाही ॥ १२ ॥
कल्पना करी उदंड काही। प्राप्तव्य तो काहीच नाही।
अखंड पडला संदेही। अनुमानाचे ॥ १३ ॥
काही नेमकपण आपुले। बहुत जनासी कळो आले।
तेचि मनुष्य मान्य झाले। भूमंडळी ॥ १४ ॥
झिजल्यावाचूनि कीर्ति कैची ?। मान्यता नव्हे की फुकाची।
जिकडे तिकडे होते ची ची। अवलक्षणे ॥ १५ ॥
भल्याची संगती धरीना। आपणास शहाणे करीना।
तो आपला आपण वैरी जाणा। स्वहित नेणे ॥ १६ ॥

जेथे नाही उत्तम गुण । ते करंटकपणाचे लक्षण ।
बहुतासि न माने ते अवलक्षण । सहजचि झाले ।। १७ ।।

कार्यकारण सकळ काही । कार्यांविण ते काहीच नाही ।
निकामी तो दु:खप्रवाही । वाहतचि गेला ।। १८ ।।

बहुतासी मान्य थोडा । त्याच्या पापास नाही जोडा ।
निराश्रयी पडे उघडा । जेथे तेथे ।। १९ ।।

याकारणे अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे ।
तेणे मनासारखे फावे । सकळ काही ।। २० ।। (द. १९ स. ३)

लोक नाना परीक्षा जाणती । परी अंतरपरीक्षा नेणती ।
तेणे प्राणी करंटे होती । संदेह नाही ।। २१ ।। (द. १२ स. ३)

विद्या नाही, बुद्धि नाही । विवेक नाही साक्षेप नाही
कुशलता नाही न्याय नाही । म्हणोनि प्राणी करंटा ।। २२ ।।
(द. ९ स. ४)

## ७. सदेव लक्षणे

सुंदर अक्षर लिहो जाणे । चपळ शुद्ध वाचू जाणे ।
अर्थांतर सांगू जाणे । सकळ काही ।। १ ।।

कोणाचे मनोगत तोडीना । भल्याची संगती सोडीना ।
सदैव लक्षण अनुमाना ! आणून ठेवी ।। २ ।।

नाना उत्तम गुण सत्पात्र । तेचि मनुष्य जगमित्र ।
प्रकट कीर्ति स्वतंत्र । पराधीन नाही ।। ३ ।।

राखे सकळांचे अंतर । उदंड करी पाठांतर ।
नेमस्तपणाचा विसर । पडणार नाही ।। ४ ।।

नम्रपणे पुसो जाणे । नेमस्त अर्थ सांगो जाणे ।
बोला ऐसे वर्तो जाणे । उत्तम क्रिया ।। ५ ।।

जो मानला बहुतांशी । कोणी बोलो न शके त्यासी ।
चमचमीत पुण्यराशी । महापुरुष ॥ ६ ॥
जो परोपकार करीताचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।
मग काय उणे तयाला । भूमंडळी ॥ ७ ॥
बहुतजन वास पाहे । वेळेसी तात्काळ उभा राहे ।
उणे कोणाचे न साहे । तया पुरुषासी ॥ ८ ॥
न्याय, नीति, भजन-मर्यादा । काळ सार्थक करी सदा
दरिद्रपणाची आपदा । तेथे कैची ॥ ९ ॥
जाणता पुरुष असेल जेथे । कलह कैचा उठेल तेथे ? ।
उत्तमगुणाविषयी रिते । ते प्राणी करंटे ॥ १० ॥
प्रपंची जाणे राजकारण । परमार्थी साकल्य विवरण ।
सर्वांमध्ये उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ ११ ॥
अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करू नका ।
जेथे तेथे विवेका । प्रकट करी ॥ १२ ॥
आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर ।
तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ॥ १३ ॥
दुसऱ्याच्या दुःखे दुखावे । दुसऱ्याच्या सुखे सुखावे ।
अवघेचि सुखी असावे । ऐशी वासना ॥ १४ ॥
बहुतासि वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार ।
धीर, उदार, गंभीर । महापुरुष ॥ १५ ॥
जितुके काही उत्तम गुण । ते समर्थाचे लक्षण ।
अवगुण ते करंटक लक्षण । सहजचि झाले ॥ १६ ॥ (द. १९ स. ४)
ऐका सदैवपणाचे लक्षण । रिकामा जाऊ ना दे क्षण ।
प्रपंच व्यवसायाचे ज्ञान । बरे पाहे ॥ (द. ११ स. ३)

## ८. गोड भाषा

आपणासि चिमटा घेतला । तेणे कासावीस झाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखीत जावे ॥ १ ॥
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।
आपणास घात करी । कोणी एका प्रसंगी ॥ २ ॥
पेरिले ते उगवते । बोलण्यासारखे उत्तर येते ।
तरी मग कर्कश बोलावे ते । काय निमित्त ॥ ३ ॥ (द. १२ स. १०)

## ९. गुणांची जाण

जाणता तो कार्य करी । नेणता तो काहीच न करी ।
जाणता तो पोटभरी । नेणता भीक मागे ॥ १ ॥
हे तो प्रगटचि असे । जगी पाहता प्रत्यक्ष दिसे ।
विद्येवीण करंट वसे । विद्या तो भाग्यवंत ॥ २ ॥
वडील आहे करंटा । आणि समर्थ होय धाकुटा ।
का जे विद्येने मोठा । म्हणूनिया ॥ ३ ॥
वडील समर्थ, धाकटा भिकारी । ऐका याची कैसी परी ।
वडिला ऐसा व्याप न करी । म्हणोनिया ॥ ४ ॥
जैसी विद्या तैसी हाव । जैसा व्याप तैसे वैभव ।
तोलासारखा हावभाव । लोक करिती ॥ ५ ॥
पशुपक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ ।
गुण नसता जिणे व्यर्थ । प्राणिमात्राचे ॥ ६ ॥
याकारणे उत्तम गुण । तेचि भाग्याचे लक्षण ।
लक्षणेवीण अवलक्षण । सहजचि आले ॥ ७ ॥

जनांमध्ये जो जाणता । त्यास आहे मान्यता ।
कोणीएक विद्या असता । महत्त्व पावे ॥ ८ ॥
जाणता समर्थांचे अंतर । प्रसंगे वर्ते तदनंतर ।
भाग्यवैभव अपार । तेणेचि पावे ॥ ९ ॥
म्हणोनी जाणणे नव्हे सामान्य । जाणता होईजे सर्वमान्य ।
काहीच नेणता अमान्य । सर्वत्र करिती ॥ १० ॥
जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचे खोटे कर्म ।
सकळ नाही धर्माधर्म । जाणतया कळे ॥ ११ ॥
म्हणोनि अलक्ष करू नये । जाणते हाचि उपाय ।
जाणता सापडे सोय । परलोकाची ॥ १२ ॥
जाणणे म्हणजे स्मरण । नेणणे म्हणजे विस्मरण ।
दोहीमध्ये कोण प्रमाण । शहाणे जाणती ॥ १३ ॥ (द. ९. स. ४)
जाणत्याची संगती धरावी । जाणत्याची सेवा करावी ।
जाणत्याची सद्बुद्धी घ्यावी । हळू हळू ॥ १४ ॥
जाणत्यास करावा उपकार । जाणत्यास झिजावे शरीर ।
जाणत्याचा पहावा विचार । कैसा आहे ॥ १५ ॥
जाणत्याच्या कासेसी लागावे । जाणत्याचे औषध घ्यावे ।
जाणता सांगेल ते करावे । पथ्य आधी ॥ १६ ॥
जाणत्याचे पेच जाणावे । जाणत्याचे पीळ उकलावे ।
जाणता राखेल तैसे राखावे । लोक राजी ॥ १७ ॥
जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग ।
जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ॥ १८ ॥
जाणत्याचा साक्षेप घ्यावा । जाणत्याचा तर्क जाणावा ।
जाणत्याचा उल्लेख समजावा । न बोलताचि ॥ १९ ॥

जाणत्याची कवित्वे शिकावी । गद्ये पद्ये ओळखावी ।
माधुर्यवचने समजावी । अंतर्यामी ॥ २० ॥
जाणत्याचे पहावे प्रबंध । जाणत्याचे वचनभेद ।
जाणत्याचे नाना संवाद । बरे शोधावे ॥ २१ ॥
जाणत्याच्या नाना कल्पना । जाणत्याची दीर्घ सूचना ।
जाणत्याची विवंचना । समजोन घ्यावी ॥ २२ ॥
जाणत्याचा काळ सार्थक । जाणत्याचा अध्यात्मविवेक ।
जाणत्याचे गुण अनेक । अवघेच घ्यावे ॥ २३ ॥ (द. १८ स. २)

## १०. शहाणा

जेथे उदंड जाणीव । तेचि तितुके सदैव ।
थोडे जाणीवेने निर्दैव । होती लोक ॥ १ ॥
व्याप आटोप करिती । धक्के चपेटे सोशिती ।
तेणे प्राणी सदैव होती । देखत देखता ॥ २ ॥
थोर लहान बुद्धीपाशी । सगट कळेना लोकांशी ।
आधी उपजले तयासी । थोर म्हणती ॥ ३ ॥
गुणेवीण वडिलपण । हे तो अवघेच अप्रमाण ।
त्याची प्रचीत प्रमाण । थोरपणी ॥ ४ ॥
तथापि वडिलांस मानावे । वडिले वडिलपण जाणावे ।
नेणता पुढे कष्टावे । थोरपणी ॥ ५ ॥
याकारणे कोणीएके । शहाणपण शिकावे विवेके ।
विवेक न शिकता तुके । तुटोनि जाती ॥ ६ ॥
शहाण्यास कोणी तरी पाहती । मूर्खास लोक दवडून देती ।
जीवास आवडे संपत्ती । तरी शहाणे व्हावे ॥ ७ ॥

अहो या शहाणपणाकारणे। बहुतांचे कष्ट करणे।
परंतु शहाणपण शिकणे। उत्तमोत्तम ॥ ८ ॥
जो बहुतास मानला। तो जाणावा शहाणा झाला।
जनी शहाण्या मनुष्याला। काय उणे? ॥ ९ ॥ (द. १५ स. ३)
उत्तम संगती धरावी। आपली आपण चिंता करावी।
अंतरी बरी विवरावी। बुद्धि जाणत्याची ॥ १० ॥
साक्षेपी शहाण्याची संगति। तेणे साक्षेपी शहाणे होती।
आळशी मूर्खाची संगति। आळशी मूर्ख ॥ ११ ॥
शहाणा यत्न त्याच्या गुणे। पाहो जाता काय उणे?।
सुख संतोषे भोगणे। नाना श्लाघ्यता ॥ १२ ॥ (द. १७ स. ७)
आधी राखावा आचार। मग पहावा विचार।
आचारविचारे पैलपार। पाविजंतो ॥ १३ ॥
म्हणोनि सत्संगेचि जावे। सच्छात्राचि श्रवण करावे।
उत्तम गुणास अभ्यासावे। नाना प्रयत्ने ॥ १४ ॥ (द. १७ स. १०)

## ११. गृहस्थाश्रम

बहुता जन्माचा शेवट। नरदेह सापडे अवचट
येथे वर्तावे चोखट। नीतिन्याये ॥ १ ॥ (द. ११ स. ३)
नरदेही गृहस्थाश्रम। सकळामध्ये उत्तमोत्तम
परंतु पाहिजे स्वधर्म। आणि भूतदया ॥ २ ॥
सर्वप्रकारे नेमक। शास्त्रोक्त करणे काही एक।
त्याहीमध्ये अलौकिक। भक्तिमार्ग ॥ ३ ॥
जो दुसऱ्याचे अंतर जाणे। देश–काळ–प्रसंग जाणे
तया पुरुषा काय उणे?। भूमंडळी ॥ ४ ॥ (द. १४ स. ७)

साक्षेप करता कष्टती । परंतु पुढे सुरवाडती ।
खाती, जेवती, सुखी होती । यत्ने करूनी ॥ ५ ॥
प्रात:काळी उठावे । काही पाठांतर करावे ।
यथानुशक्ति आठवावे । सर्वोत्तमासी ॥ ६ ॥
जो जयाचा व्यापार । तेथे असावे खबरदार ।
दुश्चितपणे तरी पोर । बोढा लावी ॥ ७ ॥
चुके ठके विसरे सांडी । आठवण झालिया चरफडी ।
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचीत पहा ॥ ८ ॥
याकारणे सावधान । एकाग्र असावे मन
तरी मग जेविता भोजन । गोड वाटे ॥ ९ ॥
पुढे भोजन जालियावरी । काही वाची चर्चा करी ।
एकान्ती जाऊन विवरी । नाना ग्रंथ ॥ १० ॥
काही मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी
शरीर कारणी लावी । काही तरी ॥ ११ ॥ (द. ११ स. ३)
बरे खावे, बरे जेवावे । बरे ल्यावे, बरे नेसावे ।
मनासारखे असावे । सकळ काही ॥ १२ ॥
अचूक यत्न करवेना । म्हणोनी केले ते सजेना ।
आपला अवगुण जाणवेना । काही केल्या ॥ १३ ॥
जो आपला आपण नेणे । तो दुसऱ्याचे काय जाणे ? ।
न्याय सांडिता दैन्यवाणे । होती लोक ॥ १४ ॥
ऐसी नव्हे वर्तणूक । परीक्षावे नाना लोक ।
समजले पाहिजे नेमक । ज्याचे त्यापरी ॥ १५ ॥
लोकी बरे म्हणायाकारणे । भल्यास लागते सोसणे ।
न सोशिता भंडवाणे । सहजचि होय ॥ १६ ॥

बोलतो खरे चालतो खरे । त्यास मिळती लहानथोरे ।
न्याय अन्याय परस्परे । सहजचि कळे ॥ १७ ॥
लोकांस कळेना तववरी । विवेके क्षमा जो न करी ।
तेणेकरता बरोबरी । होत जाते ॥ १८ ॥
जोवरी चंदन झिजेना । तव तो सुगंध कळेना ।
चंद्रन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥ १९ ॥
जव उत्तम गुण न कळे । तो या जनास काय कळे ? ।
उत्तम गुण देखता निवले । जगदंतर ॥ २० ॥
जगदंतर निवळत गेले । जगदंतरी सख्य झाले ।
मग जाणावे वोळणे । विश्वजन ॥ २१ ॥
पेरिले ते उगवते । उसणे द्यावे घ्यावे लागते ।
वर्म काढता भंगते । परांतर ॥ २२ ॥
हे अवघे आपणापाशी । तेथे मोल नाही जनासी ।
शिकवावे आपल्या मनाशी । क्षणक्षणा ॥ २३ ॥
खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला ।
तरी मौनेच खळत्याग केला । पाहिजे साधके ॥ २४ ॥
बरे करता बरे होते । हे तो प्रत्ययास येते ।
आता पुढे सांगावे ते । कोणास काय ? ॥ २५ ॥
विद्या उदंडचि शिकला । प्रसंग मात्र चुकतचि गेला ।
तरी मग तये विद्येला । कोण पुसे ॥ २६ ॥ (द. १२ स. २)
विवेकहीन जे जन । ते जाणावे पशुसमान ।
त्यांचे ऐकता भाषण । परलोक कैचा ? ॥ २७ ॥
कीर्ति करून नाही गेले । ते उगीच आले आणि गेले ।
शहाणे होऊन भुलले । काय सांगावे ॥ २८ ॥ (द. १२ स. ८)

करील व्याप तो भला । बहुत भाग्य लाभला ।
करील कार्य तो भला । बहुचाकित एकला ॥ २९ ॥
शुद्ध क्रिया ते प्रमाण । नसता सर्वही अप्रमाण ।
जैसे युद्ध केलियावीण । शूरता नाही ॥ ३० ॥
न्याय अन्याय जो जाणे । अन्याय त्याचेनि ना होणे ।
नीतिन्याये मिळो जाणे । तोचि तो लोकसंग्रही ॥ ३२ ॥
शूररत्ने परीक्षावी । प्रत्ययाची पाहून घ्यावी ।
येर ती अवघी सांडावी । एकीकडे ॥ ३२ ॥
ऐका फडणिसीचे लक्षण । विरंग जाऊ ना दे क्षण ।
समस्तांचे अंतःकरण । सांभाळित जावे ॥ ३३ ॥
शुद्ध सोने पाहूनि घ्यावे । कसी लावूनि तावावे ।
श्रवणमनने जाणावे । प्रत्ययासी ॥ ३४ ॥
खोटे कोठेच चालेना । खोटे कोणास मानेना ।
याकारणे अनुमाना । खरे आणावे ॥ ३५ ॥
लिहिणे न येता व्यापार केला । काहीएक दिवस चालला ।
पुसता सुरनीस भेटला । तेव्हा खोटे ॥ ३६ ॥
सर्व अवघे हिशेबी ठावे । प्रत्यक्ष साक्षीने बोलावे ।
मग सुरनिसे काय करावे । सांगाना का ॥ ३७ ॥ (द. १८ स. ५)
लहान थोर काम काही । केल्या वेगळे होत नाही ।
करंट्या सावध पाही । सदैव होसी ॥ ३८ ॥
अंतरी नाही सावधानता । यत्न ठाकेना पुरता ।
सुखसंतोषाची वार्ता । तेथे कैची ? ॥ ३९ ॥
नेमस्त नेटके पुसावे । विशद करून सांगावे ।
प्रत्ययेवीण बोलावे । तेचि पाप ॥ ४० ॥

सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ।
जनास माने ऐसीं करावी । क्रियासिद्धि ॥ ४१ ॥
बहुतांचे समाधान राखावे । बहुतास मानेल ते बोलावे ।
विलग पडो नेदावे । कथेमध्ये ॥ ४२ ॥
लोकांस उदंड पाणी आणू नये । लोकांची उकलावी हृदये ।
तरी मग स्वभावे होये । नामघोष ॥ ४३ ॥
जैसे बोलणे बोलावे । तैसेचि चालणे चालावे ।
मग महंतलीला स्वभावे । अंगी बाणे ॥ ४४ ॥
युक्तीवीण साजिरा योग । तो दुराशेचा रोग
संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ॥ ४५ ॥
ऐसे न करावे सर्वथा । जनास पावत्रू नये व्यथा ।
हृदयी चिंतावे समर्था । रघुनाथजीसी ॥ ४६ ॥
घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहून जाड ।
तेथे कैचे आणिले द्वाड । करंटपण ॥ ४७ ॥ (द. १३ स. ९)

## १२. चातुर्य

रूप-लावण्य अभ्यासिता नये । सहज गुणासी न चले उपाय ।
काही तरी धरावी सोय । आगंतुक गुणाची ॥ १ ॥
अवगुण सोडिता जाती । उत्तम गुण अभ्यासिता येती ।
कुविद्या सांडून शिकती । शहाणे विद्या ॥ २ ॥
मूर्खपण सांडिता जाते । शहाणपण शिकता येते ।
कारभार करता उमजते । सकळ काही ॥ ३ ॥
ऐसी प्रचीत येते मना । तरी का स्वहित कराना ? ।
सन्मार्गे चालता जना । सज्जना माने ॥ ४ ॥

मान्यता आवडे जीवी । तरी का उपेक्षा करावी ? ।
चातुर्येवीण उंच पदवी । कदापि नाही ॥ ५ ॥
अंतर्कळा शृंगारावी । नाना परी उमजवावी ।
संपदा मेळवूनि भोगावी । सावकाश ॥ ६ ॥
आपण दुसऱ्यास करावे । ते उसने सवेच घ्यावे ।
जना कष्टविता कष्टावे । लागेल बहु ॥ ७ ॥
न्याये वर्तेल तो शहाणा । अन्यायी तो दैन्यवाणा ।
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ ८ ॥
समाधाने समाधान वाढे । मैत्रीने मैत्री जोडे ।
मोडिता क्षणमात्र मोडे । बरेपण ॥ ९ ॥
चातुर्ये शृंगारे अंतर । वस्त्रे शृंगारे शरीर ।
दोहोंमध्ये कोण थोर । बरे पहा ॥ १० ॥
तने मने झिजावे । तेणे भले म्हणून घ्यावे ।
उगेचि कल्पिता शिणावे । लागेल पुढे ॥ ११ ॥
लोकी कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथे घडे ।
लोक सहजाच ओढे । कामासाठी ॥ १२ ॥
म्हणोनि दुसऱ्यास सुखी करावे । तेणे आपण सुखी व्हावे ।
दुसऱ्यास कष्टविता कष्टावे । लागेल स्वये ॥ १३ ॥
समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष झाले ।
या वेगळे उरले । ते करंट पुरुष ॥ १४ ॥
जितुका व्याप तितुके वैभव । वैभवासारखा हावभाव ।
समजले पाहिजे उपाव । प्रगटाचि आहे ॥ १५ ॥
बहुतांचे मुखी उरावे । बहुतांचे अंतरी भरावे ।
उत्तमगुणी विवरावे । प्राणिमात्रासी ॥ १६ ॥ ( द. १४ स. ६ )

श्रेष्ठ कार्य करी तो श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ ।
कर्मानुसार प्राणी श्रेष्ठ । अथवा भले ॥ १७ ॥
अवघेच म्हणती आम्ही थोर । अवघेचि म्हणती आम्ही सुंदर ।
अवघेच म्हणती आम्ही चतुर । भूमंडळी ॥ १८ ॥
ऐसा विचार आणिता मना । कोणीच लहान म्हणवीना ।
जाणते आणिती अनुमाना । सकळ काही ॥ १९ ॥
सत्याचा जो अभिमान । तो जाणावा निरभिमान ।
न्याय अन्याय समान । कदापि नव्हे ॥ २० ॥
आचारविचारेवीण । जे जे करणे तो तो शीण ।
धूर्त आणि विचक्षण । तेचि शोधावे ॥ २१ ॥
उदंड बाजारी मिळाले । परि ते धूर्तेंचि आळिले ।
धूर्तापाशी काहीच न चले । बाजाऱ्यांचे ॥ २२ ॥
याकारणे मुख्य मुख्य । तयासी करावे सख्य ।
येणेकरता असंख्य । बाजारी मिळती ॥ २३ ॥
समर्थांचे राखता मन । तेथे येती उदंड जन ।
जन आणि सज्जन । आर्जव करिती ॥ २४ ॥
ओळखीने ओळख साधावी । बुद्धीने बुद्धी बोधावी ।
नीतिन्याये वाट रोधावी । पाखंडाची ॥ २५ ॥
वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा ।
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडू नये ॥ २६ ॥
भेटेभेटो उरी राखणे । ही चातुर्याची लक्षणे ।
मनुष्यमात्र उत्तम गुणे । समाधान पावे ॥ २७ ॥ ( द. १५ स. १ )
उदंडांचे उदंड ऐकावे । परी ते प्रत्यये पहावे ।
खरे खोटे निवडावे । अंतर्यामी ॥ २८ ॥

वेडे करावे शहाणे । तरीच जिणे श्लाघ्यवाणे ।
उगेच वादंग वाढविणे । हे मूर्खपण ॥ २९ ॥
जो दुसऱ्याचे हितावरी । तो विपट काहीच न करी ।
मानत मानत विवरी । अंतर तयाचे ॥ ३० ॥
उगीच करिती बडबड । परी करून दाखविणे अवघड ।
परस्थळ साधणे जड । कठीण आहे ॥ ३१ ॥
धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहत जावे ।
पस्तावोनि परावे । आपले होती ॥ ३२ ॥
प्रसंग जाणोनि बोलावे । आपण काहीच न घ्यावे ।
लीनता धरून जावे । जेथे तेथे ॥ ३३ ॥
जैसे जयास पाहिजे । तैसे तयास दीजे ।
तरी मग श्रेष्ठचि होईजे । सकळा मान्य ॥ ३४ ॥
भूमंडळी सकळास मान्य । तो म्हणू नये सामान्य ।
कित्येक लोक अनन्य । तया पुरुषाशी ॥ ३५ ॥
ऐसी चातुर्याची लक्षणे । चातुर्ये दिग्विजय करणे
मग तयास काय उणे । जेथे तेथे ॥ ३६ ॥ (द. १५ स. ६)

## १३. उत्तम पुरुष

आपण यथेष्ट जेवणे । उरले ते अन्न वाटणे ।
परंतु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसे ज्ञाने तृप्त व्हावे । तेचि ज्ञान जनास सांगावे ।
तरतेने बुडो नेदावे । बुडतयासी ॥ २ ॥
उत्तम गुण स्वये घ्यावे । ते बहुतास सांगावे ।
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥

शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे ।
उणे पडो नेदावे । कोणाएकाचे ॥ ४ ॥
आडले जाकसले जाणावे । यथानुशक्ति कामास यावे ।
मृदुवचने बोलत जावे । कोणाएकासी ॥ ५ ॥
दुसऱ्यांच्या दुःखे दुःखी व्हावे । परसंतोषे सुखी व्हावे ।
प्राणिमात्रास मेळवून घ्यावे । बऱ्या शब्दे ॥ ६ ॥
दुसऱ्याचे अंतर जाणावे । तदनुसारचि वर्तावे ।
लोकांस परीक्षित जावे । नाना प्रकारे ॥ ७ ॥
नेमकेचि बोलावे । तत्काळचि प्रतिवचन द्यावे ।
कदापि रागासि न यावे । क्षमारूपे ॥ ८ ॥
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।
सावधपणे करीत जावा । संसार आपला ॥ ९ ॥
नेमकपणे वर्तो लागला । तो बहुतांस कळो आला ।
सर्व आर्जवी तयाला । काय उणे ॥ १० ॥
ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावे पुरुष ।
जयाच्या भजने जगदीश । तृप्त होय ॥ ११ ॥
उत्तमगुणी शृंगारला । विद्यावैभवे शोभला ।
तोचि एक जाणावा भला । भूमंडळी ॥ १२ ॥
कीर्ति पाहो जाता सुख नाही । सुख पाहता कीर्ति नाही ।
विचारेवीण कोठेचि नाही । समाधान ॥ १३ ॥
आपले अथवा परावे । कार्य अवघेचि करावे ।
प्रसंगी कामास चुकवावे ! हे विहित नव्हे ॥ १४ ॥
आपुल्या पुरुषार्थ वैभवे । बहुतांसि सुखी करावे ।
परंतु कष्टी करावे । हे राक्षसी क्रिया ॥ १५ ॥

जो उत्तमगुणे शोभला । तोचिं पुरुष महा भला ।
कित्येक लोक तयाला । शोधित फिरती ॥ १६ ॥
जे जे जनास मानेना । ते ते जनही मानेना ।
आपण एकला जन नाना । सृष्टीमध्ये ॥ १७ ॥
म्हणोनि सांगाती असावे । मानत मानत शिकवावे ।
हळू हळू शेवटा न्यावे । विवेकाने ॥ १८ ॥ ( द. १२ स. १० )
अति सर्वत्र वर्जावे । प्रसंग पाहोन चालावे ।
हट निग्रही न पडावे । विवेकी पुरुषे ॥ १९ ॥
महायत्ने सावधपणे । समयी धारिष्ट धरणे ।
अद्भुताचि कार्य करणे । देणे ईश्वराचे ॥ २० ॥ ( द. १८ स. ६ )

# रामदासांचा प्रपंचपरमार्थबोध

## १. जनस्वभाव

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी ।
या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ॥ १ ॥
जेणे परमार्थ वोळखिला । तेणे जन्म सार्थक केला ।
येर तो पापी जन्मला । कुळक्षयाकारणे ॥ २ ॥
जनाचा लालची स्वभाव । आरंभीच म्हणती देव ।
म्हणजे मजला काही देवो । ऐसी वासना ॥ ३ ॥
काहीच भक्ति केली नसता । आणि इच्छिती प्रसन्नता ।
जैसे काहीच सेवा न करता । स्वामीस मागती ॥ ४ ॥
कष्टेवीण फल नाही । कष्टेवीण राज्य नाही ।
कष्टेवीण होत नाही । साध्य जनी ॥ ५ ॥
आधी कष्टाचे दुःख भोगिती । ते पुढे सुखाचे फळ भोगती ।
आधी आळसे सुखावती । त्यासी पुढे दुःख ॥ ६ ॥
मेळविती तितुके भक्षिती । ते कठिण काळी मरोनि जाती ।
दीर्घसूचनेने वर्तती । तेचि भले ॥ ७ ॥
जिही उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥ ८ ॥
त्याची पैसावती कुबुद्धी । तेथे कैची असेल शुद्धी ? ।
कुबुद्धि तेचि सुबुद्धि । ऐसे वाटे ॥ ९ ॥
मनुष्ये शुद्धीस सांडावे । त्याचे काय खरे मानावे ।
जेथे विचाराच्या नावे । शून्याकार ॥ १० ॥

विचारे इहलोक परलोक । विचारे होतसे सार्थक ।
विचारे नित्यानित्य विवेक । पाहिला पाहिजे ॥ ११ ॥ (द. १८ स. ७)

## २. प्रपंच आणि परमार्थ

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।
येथे आळस करू नका । विवेकी हो ॥ १ ॥
संसारी असता मुक्त । तोचि जाणावा संयुक्त ।
अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ॥ २ ॥
प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ३ ॥
म्हणोनि असावी दीर्घसूचना । अखंड करावी चालना ।
पुढे होणार अनुमाना । आणून सोडावे ॥ ४ ॥
म्हणोनि सर्व सावधान । धन्य तयांचे महिमान ।
जनी राखे समाधान । तोचि एक ॥ ५ ॥
चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला ।
ते वेळी सावरायला । अवकाश कैचा ॥ ६ ॥
म्हणूनि दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पाहावा विवेक ।
लोकाकरता लोक । शहाणे होती ॥ ७ ॥
मनुष्य पारखू राहेना । आणि कोणाचे मन तोडीना ।
मनुष्यमात्र अनुमाना । आणून पाहे ॥ ८ ॥
दिसे सकळास सारखा । पाहता विवेकी नेटका ।
कामी निकामी लोका । बरे पाहे ॥ ९ ॥
जाणोनि पाहिजेत सर्व । होचि तयाचे अपूर्व ।
ज्याचे त्यापरी गौरव । राखो जाणे ॥ १० ॥ (द. १२ स. १)

## ३. नरदेहप्रशंसा

संत, महंत, ऋषि, मुनी। सिद्ध, साधु, समाधानी।
भक्त, मुक्त, ब्रह्मज्ञानी। विरक्त, योगी, तापसी ॥ १ ॥
तत्त्वज्ञानी, योगाभ्यासी। ब्रह्मचारी, दिगंबर, संन्यासी।
षड्दर्शनी तापसी। नरदेहीच जाहले ॥ २ ॥
नरदेह हा स्वाधीन। सहसा नव्हे पराधीन।
परंतु हा परोपकारी झिजवून। कीर्तिरूपे उरवावा ॥ ३ ॥
सांग नरदेह जोडले। आणि परमार्थबुद्धि विसरले।
ते मूर्ख कैसे भ्रमले। माया जाळी ॥ ४ ॥
देह परमार्थी लाविले। तरीच त्याचे सार्थक झाले।
नाही तरी व्यर्थचि गेले। नाना आघाते मृत्युपंथ ॥ ५ ॥ (द. २ स. १०)
नाना शब्द नाना स्पर्श। नाना रूप नाना रस।
नाना गंध ते विशेष। नरदेह जाणे ॥ ६ ॥
अमूल्य रत्ने नाना वस्त्रे। नाना याने नाना शस्त्रे।
नाना विद्या कळा शास्त्रे। नरदेह जाणे ॥ ७ ॥
दृश्य अवघेचि पाहावे। स्थानमान सांभाळावे।
सारासार विचारावे। नरदेहे जाहलिया ॥ ८ ॥
अष्टभोग नवरस। नाना प्रकारींचा विलास।
वाच्यांश, लक्ष्यांश, सारांश। मनुष्य जाणे ॥ ९ ॥
नरदेह परम दुर्लभ। येणे घडे अलभ्य लाभ।
दुर्लभ ते सुलभ। होत असे ॥ १० ॥
येथे जेणे आळस केला। तो सर्वस्व बुडाला।
देव नाही ओळखला। विवेकबळे ॥ ११ ॥

नर तोचि नारायण । जरी प्रत्यये करी श्रवण ।
मननशीळ अंतःकरण । सर्वकाळ ॥ १२ ॥
जेणे स्वयेचि पोहावे । त्यास कासेस न लगे लागावे ।
स्वतंत्रपणे शोधावे । सकळ काही ॥ १३ ॥
सकळ शोधून राहिला । संदेह कैसा तयाला ? ।
पुढे विचार कैसा झाला । त्याचा तोचि जाणे ॥ १४ ॥ (द. २०.स. ५)

## ४. नरदेहकर्तव्य

नरदेहीं आलिया एक । काही करावे सार्थक ।
जेणे पाहिजे परलोक । परम दुर्लभ जो ॥ १ ॥
नाना शास्त्रे धांडोळावी । अथवा तीर्थे तरी करावी ।
अथवा पुरश्चरणे बरवी । पापक्षयाकारणे ॥ २ ॥
अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार ।
निरूपणी सारासार । विवेक करणे ॥ ३ ॥
जन्मा आलियाचे फळ । काही करावे सफळ ।
ऐसे न करिता निष्फळ । भूमिभार होय ॥ ४ ॥
नरदेहाचे उचित । काही करावे आत्महित ।
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमी लावावे ॥ ५ ॥
हे काहीच न धरी जो मनी । तो मृतप्राय वर्ते जनी ।
जन्मास येऊन तेणे जननी । वायाच कष्टविली ॥ ६ ॥ (द. २ स.४)

## ५. गुणत्रय

मुळी देह त्रिगुणांचा । सत्वरजतमांचा ।
त्यामध्ये सत्वाचा । उत्तमगुण ॥ १ ॥ (द. २ स. २)

माझे घर माझा संसार । देव कैचा आणिला थोर ।
ऐसा करी जो निर्धार । तो रजोगुण ॥ २ ॥
बरे खावे बरे जेवावे । बरे ल्यावे बरे नेसावे ।
दुसऱ्याचे अभिलाषावे । तो रजोगुण ॥ ३ ॥
मी तरुण मी सुंदर । मी बलाढ्य मी चतुर ।
मी सकळांमध्ये थोर । म्हणे तो रजोगुण ॥ ४ ॥
जे जे दृष्टी पडले । ते ते मने मागितले ।
लभ्य नसता दुःख झाले । तो रजोगुण ॥ ५ ॥
टवाळी ढवाळी निंदा । सांगणे घडे विवादा ।
हास्यविनोद करी सर्वदा । तो रजोगुण ॥ ६ ॥
देवकारणी लाजाळू । उदरालागी कष्टाळू ।
प्रपंची जो स्नेहाळू । तो रजोगुण ॥ ७ ॥
गोडग्रासी आळकेपण । अत्यादरे पिंडपोषण ।
रजोगुणे उपोषण । केले न वचे ॥ ८ ॥ (द. २ स. ५)
अंतरी दुःखसंबंध । प्राप्त होता उठे खेद
का अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ॥ ९ ॥
शरीरी क्रोध भरता । नोळखी मातापिता
बंधु, बहीण, कांता । ताडी तो तमोगुण ॥ १० ॥
भरले क्रोधाचे काविरे । पिश्याच्यापरी वावरे
नाना उपायी नावरे । तो तमोगुण ॥ ११ ॥
अंतरी धरुन कपट । पराचे करी तळपट
सदा मस्त, सदा उद्धट । तो तमोगुण ॥ १२ ॥
कलह व्हावा ऐसे वाटे । झोंबी घ्यावी ऐसे उठे
अंतरी द्वेष प्रकटे । तो तमोगुण ॥ १३ ॥

उगेच खावे, उगेच असावे । स्तब्ध होऊन बैसावे
काहीना स्मरेना स्वभावे । तो तमोगुण ॥ १४ ॥ (द. २ स. ६)
ईश्वरी प्रेमा अधिक । प्रपंच संपादणे लौकिक
सदा सन्निध विवेक । तो सत्वगुण ॥ १५ ॥
शब्द कठिण न बोले । अतिनेमेसिं चाले
योगी जेणे तोषविले । तो सत्वगुण ॥ १६ ॥
शरीर लावावे कारणी । साक्षेप उठे अंतःकरणी
सत्वगुणाची करणी । ऐशी असे ॥ १७ ॥
शांति, क्षमा, दया । निश्चय उपजे जया
सत्वगुण जाणावा तया । अंतरी आला ॥ १८ ॥
जेणे जिंकिली रसना । तृप्त जयाची वासना
जयासी नाही कामना । तो सत्वगुण ॥ १९ ॥
देह आपदेने पीडला । क्षुधे तृषेने वोसावला
तरी निश्चय राहिला । तो सत्वगुण ॥ २० ॥
सकळ जनासी आर्जव । नाहीं विरोधासी ठाव
परोपकारी वेची जीव । तो सत्वगुण ॥ २१ ॥
आप कार्याहूनि जीवीं । परकार्यसिद्धि करावी
मरूनि कीर्ति उरवावी । तो सत्वगुण ॥ २२ ॥
पराव्याचे दोषगुण । दृष्टीस देखे आपण
समुद्राऐसी साठवण । तो सत्वगुण ॥ २३ ॥
नीच उत्तर साहणे । प्रत्युत्तर न देणे
आपला क्रोध सावरणे । तो सत्वगुण ॥ २४ ॥
शरीरे घस साहणे । दुर्जनासि मिळोनी जाणे
निंदकास उपकार करणे । तो सत्वगुण ॥ २५ ॥

कोणी एकास मारी । तयासी जाऊनि वारी
जीव बंधनमुक्त करी । तो सत्वगुण ॥ २६ ॥
सन्मार्ग दाखवी जना । ज्ञान शिकवी अज्ञाना
परदुःखे शिणे जाणा । तो सत्वगुण ॥ २७ ॥
ऐसा हा सत्वगुण सात्विक । संसारसागरी तारक
येणे उपजे विवेक । ज्ञानमार्गाचा ॥ २८ ॥ (द. २ स. ७)

## ६. तापत्रय

एक ताप आध्यात्मिक । दुजा तो आधिभौतिक
तिसरा आधिदैविक । ताप जाणावा ॥ १ ॥
देह इंद्रिये आणि प्राण । यांचेनि योगे आपण
सुखदुःखे शिणे जाण । या नाव आध्यात्मिक ॥ २ ॥
नाना चिंतेची काळजी । नाना दुःखे चित्त पोळी
व्याधीवाचूनि तळमळी । या नांव आध्यामिक ॥ ३ ॥
वृद्धपणीच्या आपदा । नाना रोग होती सदा ।
देह क्षीण सर्वदा । या नाव आध्यात्मिक ॥ ५ ॥
नाना व्याधी नाना दुःखे । नाना भोग नाना खांडके
प्राणी तळमळे शोकें । या नाव आध्यात्मिक ॥ ५ ॥ (द. ३ स. ६)
सर्व भूतांचेनि संयोगे । सुखदुःख उपजो लागे ।
ताप होता मन भंगे । या नांव आधिभौतिक ॥ ६ ॥
ठेचा लागती मोडती काटे । विझती शस्त्रांचे घायटे ।
तल, शिलका आणि सराटे । या नाव आधिभौतिक ॥ ७ ॥
पराधीन बालपणी । कुशब्द-मार-जाचणी ।
अन्नवस्त्रेवीण आळणी । या नाव आधिभौतिक ॥ ८ ॥

मनुष्यहानि वित्तहानी । वैभवहानि महत्त्वहानि ।
पशुहानि पदार्थहानी । या नाव आधिभौतिक ॥ ९ ॥
दु:ख, दारिद्र्य आणि ऋण । विदेशपळणी नागवण ।
आपदा, अनुपत्ति, कदान्न । या नाव आधिभौतिक ॥ १०॥ (द.३स.७)
शुभाशुभ कर्माने जना । देहांती यमयातना ।
स्वर्ग, नरक, भोग नाना । या नाव आधिदैविक ॥ ११ ॥
नीती सांडोनिया तत्त्वता । करू नये तेचि करता ।
यमयातना भोगिता । जीव जाय ॥ १२ ॥
वेदाज्ञेने न चालती । हरिभक्ति न करती
त्यास यमयातना करिती । या नाव आधिदैविक ॥ १३ ॥
कर्कश वचने, कर्कश मार । यातनेचे नाना प्रकार
त्रास पावती दोषी नर । या नाव आधिदैविक (द. ३ स. ८)

## ७. सद्गुणलक्षण

जे यातीचा जो व्यापार । शिकविती भरावया उदर
तेही गुरु परी साचार । सद्गुरु नव्हेती ॥ १ ॥
आपुली माता आणि पिता । तेही गुरुचि तत्त्वता
गायत्रीमंत्र उपदेशिता । तो होय कुलगुरुवर ॥ २ ॥
जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी
इंद्रियदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥ ३ ॥
मुख्य सद्गुरूचे लक्षण । आधी पाहिजे विमळ ज्ञान
निश्चयाचे समाधान । स्वरूपस्थिति ॥ ४ ॥
याहीवरी वैराग्यप्रबळ । वृत्ति उदास केवळ ।
विशेष आचारे निर्मळ । स्वधर्मविषयी ॥ ५ ॥

जेथे सारासारविचार । तेथे होय जगदुद्धार ।
नवविधा भक्तिचा आधार । बहुत जनांसी ॥ ६ ॥
नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण ।
सद्गुरूचे हे लक्षण । जाणिजे श्रोती ॥ ७ ॥ (द. ५ स. २)

## ८. गुरुशिष्य

सद्गुरूवीण सच्छिष्य । तो वाया जाय निःशेष
का सच्छिष्येविण विशेष । सद्गुरु शिणे ॥ १ ॥
उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथे बीज पेरिले कीडखाद
का ते उत्तम बीज परी संबंध । खडकेसि पडला ॥ २ ॥
तैसा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनाधिकारी ।
भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥ ३ ॥
म्हणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य । तेथे न लगती सायास ।
त्या उभयतांचा हव्यास । पुरे एकसरा ॥ ४ ॥
शेत पेरिले आणि उगवले । परंतु निगेविण गेले ।
साधनेविण तैसे झाले । साधकासी ॥ ५ ॥
जोवरी पीक आपणासी भोगे । तोवरी अवघेचि करणें लागे ।
पीक आलियाहि उगे । राहूच नये ॥ ६ ॥
तैसे आत्मज्ञान झाले । तरी साधन पाहिजे केले ।
एक वेळ उदंड जेवले । तरी सामुग्री पाहिजे ॥ ७ ॥
साधन अभ्यास आणि सद्गुरु । सच्छिष्य आणि सच्छास्त्रविचारु
सत्कर्म सद्वासना पारु । पावती भवाचा ॥ ८ ॥
सदुपासना आणि सत्कर्म । सत्क्रिया आणि स्वधर्म ।
संतसंग आणि नित्यनेम । निरंतर ॥ ९ ॥

येथे शब्द नाही शिष्यासी। हे अवघे सद्गुरूपाशी।
सद्गुरु पालटी अवगुणासी। नाना यत्ने करूनी ॥ १० ॥

## ९. सच्छिष्य

मुख्य सच्छिष्याचे लक्षण। सद्गुरुवचनी विश्वास पूर्ण।
अनन्यभावे शरण। या नाव सच्छिष्य ॥ ११ ॥
शिष्य पाहिजे निष्ठावंत। शिष्य पाहिजे शुचिष्मंत।
शिष्य पाहिजे नेमस्त। सर्वप्रकारी ॥ १२ ॥
शिष्य पाहिजे अतिधीर। शिष्य पाहिजे अति उदार।
शिष्य पाहिजे अतितत्पर। परमार्थाविषयी ॥ १३ ॥
शिष्य पाहिजे परोपकारी। शिष्य पाहिजे निर्मत्सरी।
शिष्य पाहिजे अर्थांतरी। प्रवेशकर्ता ॥ १४ ॥
शिष्य पाहिजे युक्तिवंत। शिष्य पाहिजे बुद्धिवंत।
शिष्य पाहिजे संतासंत। विचार घेता ॥ १५ ॥
शिष्य पाहिजे धारिष्ठाचा। शिष्य पाहिजे दृढव्रताचा।
शिष्य पाहिजे मर्यादेचा। नीतिवन्त ॥ १६ ॥
शिष्य असावा विश्वासी। शिष्य असावा कायाक्लेशी।
शिष्य असावा परमार्थासी। वाढवू जाणे ॥ १७ ॥
शिष्य असावा स्वतंत्र। शिष्य असावा जगन्मित्र।
शिष्य असावा सत्पात्र। सर्व गुणे ॥ १८ ॥ (द. ५ स. ३)

## १०. ईश्वर

जेणे केले चराचर। केले सृष्ट्यादि व्यापार।
सर्व कर्ता निरंतर। नाम जयाचे ॥ १ ॥

ब्रह्मा विष्णु आणि हर । हे जयाचे अवतार ।
तोचि देव हा निर्धार । निश्चयेसी ॥ २ ॥
जो सृष्टि निर्माणकर्ता । तो ये सृष्टीपूर्वी होता ।
मग हे तयाची सत्ता । निर्माण झाली ॥ ३ ॥
अवघी सृष्टी जो कर्ता । तो ते सृष्टीहूनि परता ।
तेथे संशयाची वार्ता । काढूच नये ॥ ४ ॥ ( द. ८ स. १ )
नाना देवी भजन केले । ते मूळ पुरुषास पावले ।
या कारणे सन्मानिले । पाहिजे सकळ काही ॥ ५ ॥
कर्तृत्व वेगळे करावे । मग त्या देवासि पहावे ।
तरीच काही एक पडे ठावे । गौप्यगुह्य ॥ ६ ॥
नाना लीला नाना लाघवे । ते काय जाणिजे बापुड्या जीवे ।
संतसंगे स्वानुभवे । स्थिति बाणे ॥ ७ ॥
हे ज्ञानदृष्टीने पहावे । पाहोनि तेथेचि रहावे ।
निजध्यासे तद्रूप व्हावे । संगत्यागे ॥ ८ ॥ ( द. १९ स. ५ )
ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचे सामर्थ्य उगेच चाले ।
का जे पुण्यमार्गे चालले । म्हणोनिया ॥ ९ ॥
निश्चय बैसे वस्तूकडे । तरी ज्ञानमार्गेही सामर्थ्य चढे ।
कोणीएक एकान्त मोडे । ऐसे न करावे ॥ १० ॥
निष्काम बुद्धीचिया भजना । त्रैलोक्यी नाही तुलना ।
सामर्थ्येवीण घडेना । निष्काम भजन ॥ ११ ॥
कामनेने फळ घडे । निष्काम भजने भगवंत जोडे ।
फळ-भगवंता कोणीकडे । महदंतर ॥ १२ ॥
येथे बुद्धीचा प्रकाश । आणिक न चढे विशेष ।
प्रताप, कीर्ति आणि यश । निरंतर ॥ १३ ॥

सारासार विचार करणे। न्याय-अन्याय अखंड पाहणे।
बुद्धी भगवंताचे देणे। पालटेना ॥ १४ ॥ ( द. १० स. ७ )
धन्य तयांची जननी। जे लागले हरिभजनी।
त्याहींच एक जन्म जनी। सार्थक केला ॥ १५ ॥
आयुष्य हेचि रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी।
ईश्वरी अर्पूनिया लुटी। आनंदाची करावी ॥ १६ ॥
जो अन्न देतां उदरासी। शरीर विकावे लागे त्यासी।
मां जेणे घातले जन्मासी। त्यास कैसे विसरावे ॥ १७ ॥
जयासि वाटे सुख असावे। तेणे रघुनाथ भजनी लागावे।
तेणे होईल स्वभावे। समाधान ॥ १८ ॥ ( द. ३ स. १० )

## ११. भक्ती

सावध होऊनि श्रोतेजन। ऐका नवविधा भजन।
सच्छास्त्रीं बोलिले पावन। होईजे येणे ॥ १ ॥
सगुणांची चरित्रे ऐकावी। का ते निर्गुण अध्यात्मे शोधावी।
श्रवणभक्तीची जाणावी। लक्षणे ऐशी ॥ २ ॥
ऐसे हे अवघेचि ऐकावे। परंतु सार शोधूनि घ्यावे।
असार ते जाणोनि त्यागावे। या नाव श्रवणभक्ति ॥ ३ ॥ (द. ४ स. १)
सगुणकथा या नाव कीर्तन। अद्वैत म्हणजे निरूपण।
सगुण रक्षून निर्गुण। बोलत जावे ॥ ४ ॥
भक्ति ज्ञान वैराग्य लक्षण। नीति न्याय स्वधर्मरक्षण।
साधनमार्ग अध्यात्मनिरूपण। प्रांजळ बोलावे ॥ ५ ॥
कीर्तने अव्यग्रता घडे। कीर्तने निश्चय सापडे।
कीर्तने संदेह बुडे। श्रोत्यावक्त्यांचा ॥ ६ ॥ ( द. ४ स. ५ )

हर्षकाळी विषमकाळी । पर्वकाळी प्रस्तावकाळी ।
विश्रांतिकाळी निद्राकाळी । नामस्मरण करावे ॥ ७ ॥
हरिनामे प्रल्हाद तरला । नाना आघातापासूनि सुटला
नारायणनामे पावन झाला । अजामेळ ॥ ८ ॥
नाम स्मरे निरंतर । ते जाणावे पुण्य शरीर
महादोषांचे गिरिवर । रामनामे नासती ॥ ९ ॥ (द. ४ स. ३)
देव—ब्राह्मण—महानुभाव । सत्पात्र भजनाचे ठाव ।
ऐसीये ठायी सद्भाव । दृढ धरावा ॥ १० ॥
सेवावे सद्गुरुचे चरण । या नाव पादसेवन ।
चौथे भक्तीचे लक्षण । ते हे निरूपिले ॥ ११ ॥ (द. ४ स. ४)
देवब्राह्मण अग्निपूजन । साधुसंत अतीतपूजन ।
आपुले गृहींचे देवतार्चन । या नाव पाचवी भाक्ति ॥ १२ ॥
काया, वाचा आणि मने । चित्ते, वित्ते, जीवे, प्राणे ।
सद्भावे भगवदर्चने । या नाव अर्चनभक्ति ॥ १३ ॥ (द. ४ स. ५)
भक्त ज्ञानी आणि वीतरागी । महानुभाव तापसी योगी ।
सत्पात्रे देखोनि वेगी । नमस्कार घालावे ॥ १४ ॥
जेथे दिसती विशेष गुण । ते ते सद्गुरूचे अधिष्ठान ।
याकारणे तयासी नमन । अत्यादरे करावे ॥ १५ ॥
नमस्कारे लीनता घडे । नमस्कारे विकल्प मोडे ।
नमस्कारे सख्य घडे । नाना सत्पात्रासी ॥ १६ ॥
नमस्कारे दोष जाती । नमस्कारे अन्याय क्षमिती ।
नमस्कारे मोडली जडती । समाधाने ॥ १७ ॥
याकारणे नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारे वोळती वरिष्ठ ।
येथे सांगितली स्पष्ट । सहावी भक्ति ॥ १८ ॥ (द. ४ स. ६)

पडिले कार्य तितुके करावे । न्यून पूर्ण पडूंच नेदावे ।
चढते वाढते वाढवावे । भजन देवाचे ॥ १९ ॥
सकळांचे करावे पारपत्य । आलियाचे करावे आतिथ्य ।
ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ति ॥ २० ॥
वचने बोलावी करुणेची । नाना प्रकारे स्तुतीची ।
अंतरे निवती सकळांची । ऐसे वदावे ॥ २१ ॥ (द. ४ स. ७)
देवास जयाची अत्यंत प्रीति । आपण वर्तावे तेणे रीती
येणे करता भगवंती । सख्य घडे नेमस्त ॥ २२ ॥
मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना ।
चंद्र वेळेस उगवेना । तरी चकोर अनन्य ॥ २३ ॥
ऐसे असावे सख्यत्व । विवेक धरावे सत्व ।
भगवंतावरील ममत्व । सांडूच नये ॥ २४ ॥
देव कृपेचा सागर । देव करुणेचा जलधर ।
देवासी भक्ताचा विसर । पडणार नाही ॥ २५ ॥ (द. ४ स. ८)
भक्त म्हणजे विभक्त नव्हे । विभक्त म्हणजे भक्त नव्हे
विचारेवीण काहीच नव्हे । समाधान ॥ २६ ॥
तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामी ॥ २७ ॥
तत्त्वे तत्त्व जेव्हा सरे । तेव्हा आपण कैचा उरे ।
आत्मनिवेदन येणे प्रकारे । सहजचि ॥ २८ ॥
ऐसी ही नवविधा भक्ति । केल्या पाविजे सायुज्य मुक्ति
सायुज्य मुक्तीस कल्पाती । चळण नाही ॥ २९ ॥ (द. ४ स. ९)

# रामदासांचा भक्तिसेवाबोध

## १. सेवायोगी

कोणी एक कार्याचा साक्षेप । काही तरी घडे विशेष ।
काळ, साह्य ते आपोआप । होत जाते ॥ १ ॥
कार्यभाग होत चालला । तेणे प्राणी सुखी झाला ।
विचारही सुचो लागला । दिवसेदिवस ॥ २ ॥
अवघाच काळ जरी सजे । तरी अवघेच होती राजे ।
काही सजे काही न सजे । ऐसे आहे ॥ ३ ॥
ऐकल्यावीण कळले । शिकल्यावीण शहाणपण आले ।
देखिले ना ऐकिले । भूमंडळी ॥ ४ ॥
सकळ काही ऐकता कळे । कळता वृत्ति निवळे ।
नेमस्त मनामध्ये आकळे । सारासार ॥ ५ ॥
आपुल्या थोरपणासाठी । आचावाचा तोंड पिटी ।
न्याय नाही ते शेवटी । परम अन्यायी ॥ ६ ॥
सभेमध्ये कलह झाला । शब्दयोगे जाणत्याला ।
अंतर राखो नाही शिकला । कैसा योगी ? ॥ ७ ॥
अखंड आपणा सांभाळिती । क्षुल्लकपण येऊ न देती
थोर लोकांस क्षमाशांती । अगत्य करणे ॥ ८ ॥
उपाय, पर्याय, दीर्घप्रयत्न । विवेक बळे नाना यत्न
करील तयाचे महिमान । तोचि जाणे ॥ ९ ॥
न्याय, पर्याय, उपाय । मूर्खास हे कळे काय ? ।
मूर्खांकरितां चिवडा होय । मजालसीचा ॥ १० ॥

मग ते शहाणे नीट करिती । स्वये साहोनि साहविती ।
स्वये करून करविती । लोकांकरवी ॥ ११ ॥
बहुत जनास चालवी । नाना मंडळे हाल्वी ।
तेणे हे समर्थ पदवी । विवेके हो ॥ १२ ॥ ( द १८ स. १० )
अखंड राहता सलगी होते । अतिपरिचये अवज्ञा घडते ।
याकारणे विश्रांतीते । घेता च न ये ॥ १३ ॥
आळसें आळस केला । तरी मग कारभारचि बुडाला ।
अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ॥ १४ ॥
कांटीने कांटी झाडावी । झाडावी परी ते कळोंचि नेदावी ।
कळकटपणाची पदवी । असो न द्यावी ॥ १५ ॥
कोणी एक काम करता होते । न करता ते मागे पडते ।
याकारणे ढिलेपण ते । असोचि नये ॥ १६ ॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो स्वयेंचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १७ ॥
मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकांकरवी करवावे ।
कित्येक खलक उगवावे । राजकारणामध्ये ॥ १८ ॥
खळदुर्जनासीं भ्याले । राजकारण नाही राखले ।
तेणें अवधें प्रगट झालें । बरे वाईट ॥ १९ ॥
दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनी ॥ २० ॥
जनामध्ये दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ।
याकारणे ते वाट । पुसून टाकावी ॥ २१ ॥
ही धूर्तपणाची कामे । राजकारण करावे नेमे ।
ढिलेपणाच्या संभ्रमे । जाऊ नये ॥ २२ ॥

जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हा मजालसी थाटे ।
इतुके होते परी धणी कोठे । दृष्टीस न पडे ॥ २३ ॥ (द. १९ स. ९)

## २. निःस्पृह

निस्पृहता धरू नये । धरिली तरी सोडू नये ।
सोडिली तरी हिंडू नये । ओळखीमध्ये ॥ १ ॥
आचरभ्रष्ट होऊ नये । दिल्या द्रव्य घेऊ नये ।
उणा शब्द येवो नये । आपणावरी ॥ २ ॥
पोटी चिंता करू नये । कष्टे खेद मानू नये ।
समयी धीर सोडू नये । काही केल्या ॥ ३ ॥
अपमानिता शिणो नये । निखंदिता कष्टो नये ।
धिक्कारिता झुरो नये । काही केल्या ॥ ४ ॥
लोकराज धरो नये । लाजविता लाजो नये ।
खिजविता खिजो नये । सत्कर्म करिता ॥ ५ ॥
शुद्धमार्ग सोडू नये । दुर्जनासी तंडो नये ।
संबंध पडो देऊ नये । चांडाळाशी ॥ ६ ॥
तपीळपण धरो नये । भांडविता भांडो नये ।
उडविता उडवू नये । निजस्थिति आपुली ॥ ७ ॥
नित्यनेम सांडू नये । अभ्यास बुडू देऊ नये ।
परतंत्र होऊ नये । काही केल्या ॥ ८ ॥
अनर्गळता करू नये । स्वतंत्रता मोहू नये ।
कोठे तरी होऊ नये । आसक्त कदा ॥ ९ ॥
परंपरा तोडू नये । उपासना मोडू नये
ज्ञानमार्ग सोडू नये । कदाकाळी ॥ १० ॥

न मानी त्यास सांगू नये । कंटाळवाणे बोलूं नयें ।
बहुसाल असो नये । एके स्थळीं ॥ ११ ॥
थोरपणे असो नये । महत्त्व धरून बैसो नये ।
काही मान इच्छू नये । कोठेंतरी ॥ १२ ॥
साधेपण सोडू नये । सानपण मोडू नये ।
बलात्कारे जोडू नये । अभिमान अंगी ॥ १३ ॥
कठिण शब्द बोलूं नये । कठिण आज्ञा करू नये ।
कठिण धीरत्व सोडू नये । काही केल्या ॥ १४ ॥
थोरपण चुकू नये । न्याय नीति सांडू नये ।
अप्रमाण वर्तू नये । काही केल्या ॥ १५ ॥
सावधपण सोडू नये । व्यापकपण सांडू नये ।
कदा सुख मानू नये । निसुगपणाचे ॥ १६ ॥
प्रसंगेवीण बोलूं नये । अन्वयेंवीण गाऊ नये ।
विचारेवीण जाऊ नये । अविचार पंथे ॥ १७ ॥
परोपकार सांडू नये । परपीडा करू नये ।
विकल्प पडू देऊ नये । कोणी एकासी ॥ १८ ॥
ज्ञानगर्व धरू नये । सहसा छळणा करू नये ।
कोठे वाद घालू नये । कोणी एकासी ॥ १९ ॥
प्रपंचहस्ती जाऊ नये । बाष्कळ अन्न खाऊ नये ।
पाहुण्यासारखे घेऊ नये । आमंत्रणे कदा ॥ २० ॥
बहुलौकिक सांडू नये । लोकाधीन होऊ नये ।
बहुप्रीति कामा नये । निष्ठुरता खोटी ॥ २१ ॥
आशाबद्ध बोलो नये । विवेकेंवीण चालो नये ।
समाधान हालो नये । काही केल्या ॥ २२ ॥ (द. १४ स. १)

बहुत बोलणे ऐकावे । तेथे मौन्यचि धरावे ।
अल्पचिन्हे समजावे । जगदंतर ॥ १ ॥
बाष्कळामध्ये बैसो नये । उद्धटासी तंडो नये ।
आपणाकरिता खंडो नये । समाधान जनाचें ॥ २ ॥
प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसी जाजू घेऊ नका ।
खरे असताचि नासका । फड होतो ॥ ३ ॥
शोध घेता आळसो नये । अंतर आर्तांचे शोधावे ।
चटक लावून सोडावे । भल्या मनुष्यासी ॥ ४ ॥
उत्तम गुण प्रगटवावे । मग भलत्यासी बोलता फावे ।
भले पाहोनि करावे । शोधोनि मित्र ॥ ५ ॥
उपासनेसारखे बोलावे । सर्व जनास तोषवावे ।
सगट बरेपण राखावे । कोणीएकासी ॥ ६ ॥
जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशीं आहे सूत्र ।
कोठे तरी सत्पात्र । शोधून काढावे ॥ ७ ॥
सकळामध्ये विशेष श्रवण । श्रवणाहून थोर मनन ।
मनने होय समाधान । बहुत जनांचे ॥ ८ ॥
धूर्तपणे सकळ जाणावे । अंतरी अंतर बाणावे ।
समजल्याविण शिणावे । कासयासी ? ॥ ९ ॥ (द. १९ स. २)
जाणावे पराचे अंतर । उदासीनता निरंतर ।
नीतिन्यायास अंतर । पडोचि नेदावे ॥ १ ॥
संकेते लोक वेधावा । एकूनएक बोधावा ।
प्रपंचही सावरावा । यथानुशक्त्या ॥ २ ॥
दोष देखोनि झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सापडोनि सोडावे । परोपकार करुनी ॥ ३ ॥

तऱ्हे भरोंच नये । सुचावे नाना उपाय ।
नव्हे तोचि करावे कार्य । दीर्घप्रयत्ने ॥ ४ ॥
फड नासोंच नेदावा । पडिला प्रसंग सावरावा ।
अतिवाद न करावा । कोणी एकासी ॥ ५ ॥
दुसऱ्याचे अभिष्ट जाणावे । बहुतांचे बहुत सोसावे ।
न सोसे तरी जावे । दिगंतराप्रती ॥ ६ ॥
दुःख दुसऱ्याचे जाणावे । ऐकोन तरी वांटून घ्यावे ।
बरे वाईट सोसावे । समुदायाचे ॥ ७ ॥
अपार असावे पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ ८ ॥
शांति करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी
क्रिया करून करवावी । बहुतांकरवी ॥ ९ ॥
जो बहुतांचे सोशीना । त्यास बहुत लोक मिळेना ।
बहुत सोशिता उरेना । महत्त्व आपुले ॥ १० ॥
राजकारण बहुत करावे । परंतु कळोंच नेदावे ।
परपीडेवरी नसावे । अंतःकरण ॥ ११ ॥
लोक पारखून सोडावे । राजकारणे अभिमान झाडावे ।
पुनः मेळवून घ्यावे । पुढील दोरे ॥ १२ ॥
हिरवटासी दुरी धरावे । कचरटासि न बोलावे ।
संबंध पडता सोडून जावे । एकीकडे ॥ १३ ॥
पाहता तरी सापडेना । कीर्ति करू तरी राहेना ।
आले वैभव अभिलासीना । काही केल्या ॥ १४ ॥ (द. ११ स. ५)
हे शिकवण धरिता चित्ती । सकळ सुखे वोळंगति ।
आंगी बाणे महंती । अकस्मात् ॥ १५ ॥ (द. १४ स. १)

## ३. महन्त

वर्तायाचा विवेक । राजी राखणे सकळ लोक ।
हळू हळू पुण्यश्लोक । करीत जावे ॥ १ ॥
मुलांचे चालीने चालावे । मुलांचे मनोगते बोलावे ।
तैसे जनास शिकवावे । हळूहळू ॥ २ ॥
वेड्यास वेडे म्हणो नये । कर्म कदापि बोलो नये ।
तरीच घडे दिग्विजय । निस्पृहासी ॥ ३ ॥
उदंड स्थळी उदंड प्रसंग । जाणोनि करणे यथासांग ।
प्राणिमात्रांचा अंतरंग । होऊनि जावे ॥ ४ ॥
मनोगत राखोन जाता । परस्परे होय अवस्था ।
मनोगत तोडिता व्यवस्था । बरी नाही ॥ ५ ॥
याकारणे मनोगत । रोखेल तो मोठा महंत ।
मनोगत राखता समस्त । ओढोनि येती ॥ ६ ॥ (द. १३ स. १०)
थोडे बोलोनि समाधान करणे । रागेजोनि तरी मन धरणे ।
मनुष्य वेधी लावणे । कोणीएक ॥ ७ ॥
कोण कोण राजी राखले । कोण कोण मनी भंगले ।
क्षणक्षणी परीक्षिले । पाहिजे लोक ॥ ८ ॥
जिकडे तिकडे कीर्ती माजे । सगट लोकांस हव्यास उपजे ।
लोक राजी राखोनि कीजे । सकळ काही ॥ ९ ॥
जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक ।
रात्रंदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ॥ १० ॥
अभ्यासे प्रगट व्हावे । नाही तरी झाकोनी असावे ।
प्रगट होवोनि नासावे । हे बरे नव्हे ॥ ११ ॥

ही धकाधकीची कामे । तीक्ष्ण बुद्धीची वर्मे ।
भोळ्या भावार्थे संभ्रमे । कैसे घडे ॥ १२ ॥
संगीत चालला तरी तो व्याप । नाही तरी अवघाचि संताप ।
क्षणाक्षणा विक्षेप । किती म्हणोनी सांगावा ? ॥ १३ ॥ ( द.१९स.७ )
जितुके काही आपणास ठावे । तितुके हळुहळु शिकवावे ।
शहाणे करून सोडावे । सकल जन ॥ १४ ॥
परोपरी शिकवणे । आडणुका सांगत जाणे ।
निवळ करून सोडणे । निस्पृहासी ॥ १५ ॥
होईल ते आपण करावे । न होता जनाकरवी करवावे ।
भगवद्‌भजन राहावे । हा धर्म नव्हे ॥ १६ ॥
उपाधीत सांपडो नये । उपाधीस कंटाळो नये ।
निसुगपण कामा नये । कोणाएकविशीं ॥ १७ ॥
कीर्ति पाहता सुख नाही । सुख पाहता कीर्ति नाही ।
केल्यावीण कोठेच नाही । कोठे तरी ॥ १८ ॥
येरवी काय रहाते । होणार तितुके होऊन जाते ।
प्राणीमात्र अशक्त ते । पुढे आहे ॥ १९ ॥
आधीच तकवा सोडिला । मध्येच धिंवसा सांडिला ।
तरी संसार हा शेवटाला । कैसा पावे ॥ २० ॥
संसार मुळीच नासका । विवेके करावा नेटका ।
नेटका करता फिका । होत जातो ॥ २१ ॥ ( द. १९ स. १० )

## ४. महन्त लक्षणे

जाणायाचे सांगता नये । सांगायाचे नेमस्त नये ।
समजल्यावीण काहीच नये । कोणीएक ॥ १ ॥

पुसो जाणे सांगो जाणे । अर्थांतर करू जाणे ।
सकळिकांचे राखो जाणे । समाधान ॥ २ ॥
दीर्घसूचना आधी कळे । सावधपणे तर्क प्रबळे ।
जाणजाणोनि निवळे । यथायोग्य ॥ ३ ॥
ऐसा जाणे जो समस्त । तोचि महंत बुद्धिवंत ।
या वेगळे अंतवंत । सकळ काही ॥ ४॥
जो एकान्तासी तत्पर । आधी करी पाठान्तर ।
अथवा शोधी अर्थान्तर । ग्रंथगर्भीचे ॥ ५ ॥
अक्षर सुंदर वाचणे सुंदर । बोलणे सुंदर चालणे सुंदर ।
भक्ति, ज्ञान, वैराग्य सुंदर । करून दावी ॥ ६ ॥
सांकडीमध्ये वर्तो जाणे । उपाधीमध्ये मिळो जाणे ।
अलिप्तपणे राखो जाणे । आपणासी ॥ ७ ॥
आहे तरी सर्वांठायी । पाहो जाता कोठेच नाही ।
जैसा अंतरात्मा ठायीच्या ठायी । गुप्त जाहला ॥ ८ ॥
त्यावेगळे काहीच नसे । पाहो जाता तो न दिसे ।
न दिसोन वर्तवीतसे । प्राणिमात्रांसी ॥ ९ ॥
तैसाचि हाही नानापरी । बहुत जनासी शहाणे करी ।
नाना विद्या त्या विवरी । स्थूळ सूक्ष्म ॥ १० ॥
आपणांकरिता शहाणे होती । ते सहजाचि सोय धरिती ।
जाणतेपणाची महंति । ऐसी असे ॥ ११ ॥
राखो जाणे नीतिन्याय । न करी, न करवी अन्याय ।
कठिण प्रसंगी उपाय । करू जाणे ॥ १२ ॥
ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुताचा ।
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥१३ ॥ ( द. ११ स. ६ )

प्रगट कीर्ति ते ढळेना । बहुत जनांस कळेना ।
पाहो जाता आढळेना । काय कैसे ? ॥ १४ ॥
वेषभूषण ते दूषण । कीर्तिभूषण ते भूषण ।
चाळणेवीण एक क्षण । जाऊच नेदी ॥ १५ ॥
बहूती शोधून पाहिले । बहुतांच्या मनास आले ।
तरी मग जाणावे साधले । महत्कृत्य ॥ १६ ॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास शिकवावे ।
उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपे ॥ १७ ॥
अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावे जग ।
लोक समजोनि मग । आज्ञा इच्छिती ॥ १८ ॥
लोक बहुत शोधावे । त्याचे अधिकार जाणावे ।
जाणजाणोनि धरावे । जवळी दुरी ॥ १९ ॥
अधिकार पाहोनि कार्य सांगणे । साक्षेप पाहोनि विश्वास धरणे ।
आपला मगज राखणे । काही तरी ॥ २० ॥
हे प्रचीतीने बोलिलें । आधी केले मग सांगितले ।
मानेल तरी पाहिजे घेतले । कोणी एके ॥ २१ ॥
महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे ।
जाणते करून विखरावे । नाना देशी ॥२२॥ (द. ११ स. १० )
व्यापेवीण आटोप केला । तो अवघाचि घसरताचि गेला ।
अकलेचा बंध नाही घातला । दूर दृष्टीने ॥ २३ ॥
काही गलबला काही निवळ । ऐसा कंठित जावा काळ ।
जेणेकरता विश्रांति वेळ । आपणास फावे ॥ २४ ॥ (द. १९ स. ८)

## ५. प्रमाण पुरुष

स्वता निःस्पृह असेना । त्याचे बोलणेचि मानेना ।
कठीण आहे जनार्दना । राजी राखणे ॥ १ ॥
उत्कट भव्य तितुकेंचि घ्यावे । मिळमिळित अवघेचि टाकावे ।
निस्पृहपणे व्याख्यात व्हावे । भूमंडळी ॥ २ ॥
दुर्जनासी राखो जाणे । सज्जनासी निववू जाणे ।
सकळांचे मनीचे जाणे । ज्याचे त्यापरी ॥ ३ ॥
संगतीचे मनुष्य पालटे । उत्तम गुण तात्काळ उठे ।
अखंड अभ्यासी प्रगटे । समुदाय ॥ ४ ॥
जेथे तेथे नित्य नवा । जनास वाटे हा असावा ।
परंतु लालचीचा गोंवा । पडोच नेदी ॥ ५ ॥
उत्कट निस्पृहता धरली । त्याची कीर्ति दिगंती फाकली ।
उत्कट भक्तीने निवाली । जनमंडळी ॥ ६ ॥
काहीएक उत्कटेवीण । कीर्ती कदापि नोहे जाण ।
उगेचि वणवण हिंडोन । काय होई ? ॥ ७ ॥
याकारणे सावधान असावे । जितुके होईल तितुके करावे ।
भगवत्कीर्तीने भरावे । भूमंडळ ॥ ८ ॥
आपणास जे जे अनुकूल । ते ते करावे तात्काळ ।
होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ ९ ॥
अखंड तजविजा चाळणा जेथे । पाहता काय उणे तेथे ।
एकांतावीण प्राणियाते । बुद्धि कैंची ? ॥ १० ॥ ( द. १९ स. ६ )
उदंड मुले नानापरी । वडिलांचे मन अवघ्यावरी ।
तैशी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष ॥ ११ ॥

जयास कोणाचे सोसेना । तयाची निष्कांचन वासना ।
धिक्कारिल्या धिक्कारेना । तोचि महापुरुष ॥ १२ ॥ (द. १९ स. ४)
प्रबोधशक्तीची अनंतद्वारे । जाणे सकळांची अंतरे ।
निरूपणे तदनंतरे । चटक लागे ॥ १३ ॥
मते मतांतरे रागट । प्रत्यय ब्रोलोनि करी सपाट ।
दंडक सांडून नीट । वेधी जना ॥ १४ ॥
नेमके भेदके वचने ! अखंड पाहे प्रसंगमाने ।
उदात्त वृत्तीच्या गुमाने । उडोनि जातो ॥ १५ ॥
प्रत्यय बोलेनि उठोनि गेला । चटक लागली लोकाला ।
नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ॥ १६ ॥
उदंड करी गुप्तरूपे । भिकाऱ्यासारखा स्वरूपे ।
तेथे यशकीर्तिप्रतापे । सीमा सांडली ॥ १७ ॥
लोकीं लोक वाढविले । तेणे अमर्याद झाले ।
भूमंडळी सत्ता चाले । गुप्तरूपे ॥ १८ ॥
ऐशी कीर्ति करोनि जावे । तरीच संसारासी यावे ।
दास म्हणे हे स्वभावे । संकेते बोलला ॥ २० ॥ (द. १५ स. २)

## श्री. पु. पां. गोखले यांचे वाङ्मय

* वेदव्यास पं. सातवळेकर
* ना. गोखले चरित्र
* आगरकरांशी ओळख
* संत सेनापती
* गणपतीबाप्पा
* रामदासांचा बालबोध
* स्वामी रामतीर्थ
* जागृत सातारा
* नानासाहेब पेशवे

● ● ●

## खास कुमारांसाठी

पु. पां. गोखले

- गणपती बाप्पा १-२०
- जय बजरंग १-५०
- समर्थ रामदास १-५०

साने गुरुजी

- शबरी ३-००

त्र्यं. ग. बापट

- इसाप-कथा १-५०
- गोष्टीरूप बिरबल २-००

मा. गो. काटकर

- बोलक्या कथा २-००
- प्राण्यांचे जग १-००

अच्युत शिरवाडकर

- राक्षसाचे कोडे २-००

सौ. सुशीला चिकटे

- तळ्यातले रहस्य १-५०

ग. वि. अकोलकर

- सुवर्ण-सरिता २-००

वि. य. कुलकर्णी

- श्रीकृष्ण-कथा १-५०

केशव कोठावळे

- चंद्रकन्या १-५०
- ठेंगूचे पराक्रम २-००

पंढरीनाथ रेगे

- विचित्र कथा १-५०

श्यामकांत शिवरामे

- थोरांचे बालपण २-००

यदुनाथ थत्ते

- मधुराणी १-००

**इंद्रायणी साहित्य**

१२५७ सदाशिव पेठ, पुणे ३०.